*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३२ वे** | **जानेवारी-मार्च २०११** | **अंक : पहिला**

## अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------------------- २

१) आदिवासी जीवन-संस्कृतीत लाकडाचे महत्त्व - ग. शां. पंडित ३

२) महाराष्ट्रातील आदिम आदिवासींची सामाजिक व अर्थिक स्थिती
सुनिल चंदनशिवे, दुर्गेश बधे ----------------------------------- ९

३) आदिवासी भागातील आंबे लागवड (सुरगाणा तालुका) - ना. सी. पाटील ----- १४

४) आदिवासी व ग्रामीण भागातील सक्रिय समाजवादी - श्री. ना. सी. पाटील ----- १९

५) कुरमार या भटक्या जमातीचे जीवन - श्री. प्रभाकर आर. लोंढे ------------ २४

६) किनवट तालुक्यातील गोंड आदिवासींची, सामाजिक-आर्थिक परिस्थिती
प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम, श्री. धनाजी दत्तात्रय पाटील --------------- २७

७) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी - (वनहक्क मान्य करणे)
अधिनियम २००६ व नियम २००८ ------------------------------ ३४

८) शोषखड्डा सांडपाण्यावरील सोपा उपाय - ग. शां. पंडित ---------------- ४०

९) वारली चित्रकलेतून दिसणारे समाजजीवन - भुजंग गोविंद फडतरे ----------- ४५

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

**अंक मूल्य ४०/- रूपये**

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे


◆ **इतर छायाचित्रे**
मराठी विश्वकोश

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ छायाचित्र**
‘आदिवासी उत्थान कार्यक्रम’
छायाचित्र संग्रहातून साभार

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.



# संपादकीय

*'हाकारा'चा यावर्षीचा हा पहिला अंक आदिवासी संस्कृती व जमाती या दोन्हींचा परिचय करुन देणारा आहे.*

*सुरुवातीचा लेख आदिवासींमधील लाकूड संस्कृतीवर आधारीत आहे. आदिवासींच्या जीवनात लाकडाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. घराला, वेगवेगळ्या वस्तू बनवायला, देव-देवतांसाठी, अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आदिवासी झाडाच्या पानापासून ते खोडापर्यंत वेगवेगळ्या प्रकारे उपयोग करताना दिसतात. म्हणून आदिवासींना निसर्गवादी म्हटले आहे. या लेखातून त्याचे दर्शन आपल्याला घडते.*

*महाराष्ट्रात कातकरी, कोलाम व माडिया या तीन जमाती 'आदिम' मानल्या गेल्या आहेत. इतर आदिवासींच्या मानाने या जमाती मागास आहेत. या तिन्ही जमातींच्या संस्कृतीत फरक आहेच, परंतु काही समान धागे देखील आहेत. समस्येचे स्वरुप बरेचशे सारखे असले तरी तुलनात्मकदृष्ट्या त्यांच्यात काही फरकही जाणवतात. चंदनशिवे व बधे यांनी त्यांच्या अभ्यासातून ते दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.*

*मा. ना. सी. पाटील हे 'हाकारा'चे ज्येष्ठ व जुने जाणते वाचक व लेखक. ते नेहमी त्यांच्या आदिवासींमधील अनुभवाचे लेख हाकारासाठी पाठवित असतात. या अंकातही त्यांचे दोन लेख अशाच अनुभवांवर आधारित आहेत.*

*चंद्रपूरमधील 'कुरमार' या जमातीच्या वेगळेपणाची माहिती या अंकात मिळतेच शिवाय किनवटच्या गोंड जमातीच्या चालीरीतींची माहिती देखील मिळते.*

*वारली चित्रकला हा जगभरात मान्यता पावलेला कलाप्रकार. त्याविषयी अधिक जाणून घेऊ या अंकातून. याशिवाय वनहक्क जमिनीच्या कायद्याची प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मुद्देसूद माहिती मिळते.*

*अशा विविधांगाने भरलेला हा अंक आपणास निश्चित आवडेल. अंकाविषयीचे अभिप्राय जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

**ग. शां. पंडित**
कार्यकारी संपादक

# आदिवासी जीवन-संस्कृतीत लाकडाचे महत्त्व

ग. शां. पंडित

**प्रास्ताविक**

केवळ भारतातीलच नव्हे; तर जगातील सर्व आदिवासी जमाती दीर्घकाळापासून जंगलाचा आश्रय घेऊन राहिलेल्या आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात एकाकीपणाने राहिल्याने त्यांची संस्कृती निसर्गवादी बनली आहे. निसर्गाशी ते संपूर्णत: विलीन झालेले असतात. जंगलाशी त्यांचे अतूट नाते जुळलेले असते. जंगलातील झाडे, प्राणी, पक्षी ही त्यांची कुलचिन्हे / गणचिन्हे झाली आहेत. त्यांच्या संस्कृतीतील पुराणकथा देखील निसर्गाशी निगडीत असतात. म्हणूनच त्यांना 'नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी' असे सामान्यपणे म्हटले जाते.

आदिवासींच्या जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा ते जंगलातूनच मिळवितात. फळे, अनेक प्रकारची कंदमुळे, भाजीपाला हे अन्नपदार्थ त्यांना जंगलातूनच मिळतात. झाडाची पाने, साल यांचा वस्त्र म्हणून उपयोग करणाऱ्या बोंडो, कोंड यांसारख्या आदिम जमाती आजही आहेत; तर जंगलातील लाकूड, बांबू, गवत यांपासून आपली घरे बांधणारे आदिवासी भारतात व महाराष्ट्रातही आहेत.

**पर्यावरणाचे संरक्षक**

जंगलातून सर्व काही मिळत असले तरी आदिवासी, त्यांना आवश्यक असलेलीच झाडे कापतात; पण त्याचबरोबर झाडे लावण्याची जबाबदारी सुद्धा घेतात. जळणासाठी वाळलेल्या काड्या, गरजेनुसार झाडाच्या फांद्या कापतात; पण मुळासकट झाड कधी नष्ट करत नाहीत. त्या कापलेल्या झाडाला पुन्हा पालवी फुटण्याची संधी ते देतात.

आदिवासींची संग्रह करण्याची वृत्ती नसल्याने निसर्गातून ते जेवढे जरूरी आहे, तेवढेच घेतात. हे करत असताना ते जंगलाचे संरक्षणही करतात. जगातील सर्व सजीव व निर्जीवांना प्राण किंवा आत्मा असतो, असे ते मानतात. त्यामुळे वृक्ष, प्राणी, डोंगर, नद्या, शिखरे हे सर्व त्यांच्यादृष्टीने पवित्र मानले जाते. त्यांच्या या विचारसरणीमुळे निसर्गाचे फार मोठ्या प्रमाणावर संरक्षण झाले आहे. काही वने देवींना अर्पण केल्यामुळे त्या देवरायांतील कोणत्याही वनस्पतींना आदिवासी तोडत नाहीत. त्यामुळे विविध प्रकारच्या वनस्पतींचे आपोआपच संरक्षण व संवर्धन होते. अशा या संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असणाऱ्या आदिवासींना पूर्वी 'जंगलाचे राजे' म्हणून संबोधले जायचे. परंतु ब्रिटीश राजवटीत वनासंबंधी कायदे अस्तित्त्वात आल्याने आदिवासींचे अनेक हक्क हिरावले गेले.

स्वातंत्र्यानंतर त्यातून काही गोष्टींच्या सवलती आदिवासींना मिळाल्या, पण १९८० च्या वनकायद्याने त्यांच्या हक्कांवर पुन्हा गदा आली. नव्याने वनकायदा अस्तित्वात येऊन त्यात आदिवासींच्या जंगल,

जमिनींच्या बाबतीत सवलती दिल्या आहेत; परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी झालेली नाही.

जंगलाचे आणि आदिवासींचे नाते अतिशय अतूट त्याशिवाय त्यांच्या जीवनाला अर्थच उरत नाही. म्हणूनच ओरिसातील गंधमर्धनच्या जंगलात आक्रमण करु पाहणाऱ्या 'वेदांत' उद्योग समूहाला तेथील स्थानिक आदिवासींनी विरोध केला आहे. त्या जंगलाशी त्यांच्या भावना गुंतलेल्या आहेत.

**आदिवासी आणि लाकूड**

नित्योपयोगी कलाकुसरीच्या वस्तू निर्माण करण्यासाठी आणि घराच्या बांधकामासाठी प्राचीन काळापासून लाकडाचा उपयोग होताना दिसतो आहे. वाद्ये, खेळणी, शिल्पे इत्यादीसाठी देखील लाकडाचा मोठ्या प्रमाणावार वापर करण्यात येतो. शिवाय त्यासाठी आर्थिक उलाढालही मोठ्या प्रमणावर होत असते. साहजिकच त्यामुळे जंगलातील लाकडाची तोड, बांबू तोड व त्याचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. मात्र यात आदिवासींचा कुठेही संबंध आलेला दिसत नाही. निसर्गातून जेवढे मिळत राहिले, त्यावर तो संतुष्ट राहिला आहे.

आदिवासी सतत जंगलाच्या सान्निध्यात राहिल्यामुळे जंगलातील बांबूपासून, झाडांपासून (त्याच्या लाकडापासून) बनविलेल्या वस्तूच त्यांच्या नित्याच्या वापरात दिसतात. अशा उपयुक्त वस्तूंना कलात्मक रुप देण्याची प्रवृत्ती त्यांच्यात दिसून येते. त्यांच्या कलात्मक वस्तूंवर नैसर्गिक प्रतिकांची आणि प्रतिमांची छाप आढळते.

जंगलात सागवान व इतर उच्च प्रतीचे लाकूड भरपूर प्रमाणात उपलब्ध असते. अशा लाकडाला अगदी सामान्य प्रतीच्या अवजारांनी उत्कृष्ट आकार देणे वा कोरीव काम करणे, ते सहज गतीने करतात. त्यात त्यांच्या घरांची रचना, स्वयंपाकाच्या वस्तू, वाहतुकीची साधने, कंगवे-फण्या, शेतीसाठी लागणारी लहान मोठी अवजारे, धनुष्यबाण, विविध प्रकारची वाद्ये, सुपारी किंवा तंबाकू ठेवण्याच्या गोलाकार अथवा कुयरीच्या आकाराच्या डब्या, दैवते इत्यादी अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो.

**आदिवासींच्या या हस्तकौशल्याची थोडक्यात माहिती करुन घेऊया.**

**घराची रचना :**

आदिवासींची घरे दोन घटकांवर अवलंबून असतात. १) नैसर्गिक परिस्थिती व त्यातून घर बांधण्याकरिता मिळणारी सामग्री २) अन्नोत्पदनाचे स्वरूप. काही भटक्या जमातींना आपली घरे सहजासहजी हलवता येतील, अशीच तयार करावी लागतात. हैदा आदिवासींची घरे सुमारे ११ मीटर रुंद व १४ मीटर लांब असतात. तर छप्पर उंचीला दाराजवळ २ मीटर व मध्यभागी ३ मीटर असते. जवळजवळ दहा खांबांवर हे छप्पर उभे असते. भिंती लाकडाच्या असतात. आदिवासी घरांच्या जुळणीत खिळ्यांचा वापर करत नाहीत. झाडांच्या सालींनी खांब बांधले जातात. अरुणाचल, मिझोराम, झारखंड या प्रदेशांतील आदिवासींची घरे लाकूड व बांबूच्या साह्याने बांधलेली असतात. उत्तर फिलीपिन्सच्या गिरीप्रदेशातील

आदिवासींच्या घरांसाठी केवळ लाकूड, गवत व बांबूचा वापर केलेला असतो. ती घरेही वैशिष्ट्यपूर्ण असतात.

गुजरातच्या बडोदा जिल्ह्यातील छोदा उदेपूर भागातील राठवा आदिवासींची घरे अगदी साधी असतात. बांबू अथवा तुरीची धाटे एकत्र बांधून (कूड बांधून) शेणामातीने लिपून भिंती बनविलेल्या असतात. बांबूच्या कामट्या बांधून त्यावर कौल किंवा ताडाची पाने रचून छप्पर बनवले जाते. छप्पर दोन बाजूंनी उतरते असते. घर ऐसपैस असते. दरवाजा पाशीच घराबाहेर चार हात उंच लाकडाचा माचा पाणी ठेवण्यासाठी केलेला असतो. घरामध्ये सामान ठेवण्यासाठी लाकडाचा अथवा बांबूचा माळा बनविलेला असतो. वर चढण्यासाठी बांबूची शिडी असते. ओसरीच्या एका कोपऱ्यात किंवा स्वयंपाक खोलीत निरनिराळ्या प्रसंगी पूजण्यासाठी लाकडी खांब रोवलेला असतो. घरात माणसे वाढत जातात तसतशी घराच्या बाजूला ओसरी व मागे स्वयंपाकघर वाढविले जाते. घर आकाराने कितीही वाढले तरीही आत शिरण्यासाठी दरवाजा मात्र एकच ठेवला जातो. येथील भिल्लांची घरे देखील सामान्यपणे माती, बांबू किंवा तुरीच्या घाटांनीच बांधली जातात. यांच्या घराच्या पुढे गुरे बांधण्यासाठी लाकडाचे खोपट (झोपडी) बांधले जाते. छप्पर सारवून कौले किंवा पळसाची सुकलेली पाने किंवा सागाची पाने पसरुन झाकलेले असते. घराबाहेर पाण्यासाठी लाकडी माचा असतो. महाराष्ट्रातील भिल्लांची घरे देखील थोड्याफार फरकाने अशीच असतात. महाराष्ट्रातील माडिया, गोंड, कोलाम, कोरकू, कातकरी, ठाकर या आदिवासींमध्ये घरांसाठी लाकूड, बांबू, गवत याचा वापर होतोच; परंतु बहुतेक घरांच्या भिंती माती, दगड, विटांनी अर्धवट बांधलेल्या असतात.

आदिवासींच्या घरबांधणीचे वैशिष्ट्ये असे की, त्यांची घरे बांधण्यासाठी त्यांचेच नातेवाईक, शेजारी-पाजारी येतात. त्यांच्यात कोणी सुतार, गवंडी नसतो. आदिवासींमध्ये भूतखेत मानले जाते; त्यामुळे घरातील एखाद्याचा मृत्यू भूतबाधेमुळे झाला आहे, असा त्यांचा समज झाला तर ते आपले घर हलवतात (मोडतात). जाताना बरोबर केवळ खांब व तुळया घेऊन जातात.

**आदिवासी हस्तकला**

आदिवासींच्या हस्तकलेत 'लाकूड' व बांबूचा वापर कलात्मकतेने केलेला आढळतो. मातीची किंवा लाकडाची भांडी, विविध मुखवटे, गणचिन्हे, वाद्ये, हत्यारे इत्यादींमधून त्यांच्या कलेचे दर्शन घडते. वृक्ष, वेली, दगड, लाकडी ओंडके, पक्ष्यांची पिसे, मणी व जंगलात सापडणाऱ्या अनेक बारीक-सारीक गोष्टींचे अत्यंत कल्पकतेने सुबक आकार देऊन त्यात कलाकुसर अथवा हस्तकौशल्य ओतलेले आढळते. या कलेचा उपयोग आदिवासी आपल्या जमातीचा व आचार-विचारांचा प्रसार करण्यासाठीही करतात.

लाकडी व हस्तिदंताच्या कारागिरीत निग्रोवंशीय लोक अधिक वाकबगार समजले जातात. पश्चिम आफ्रिकेतील आदिवासी लाकडी मूर्ती व मुखवटे सुबकरित्या तयार करतात. एस्किमो जमातीचे मुखवटे प्रसिद्ध आहेत. न्यू गिनीतील आदिवासी आत्म्यांसाठी कलापूर्ण लाकडी समाधी तयार तरतात.


भारतातील आदिवासींमध्ये त्यांच्या प्रिय मृत व्यक्तींच्या आठवणीसाठी पहिल्या श्राद्ध दिवशी विशिष्ट जागी दगड रोवण्याची पध्दत आहे. त्या दगडावर मृत व्यक्तीला आवडणाऱ्या वस्तूंचे कोरीव लाकडी प्रतीक करुन ठेवलेले आढळते. यात अनेकदा मोर, बंदूक, प्राण्यांची तोंडे इत्यादी कोरलेली आढळून येतात. त्यांच्या पूर्वजांचे स्मृतीस्तंभही लाकडाचे असतात.

लग्न समारंभाच्यावेळी मांडवात लांबलचक लाकडी बुंद्यातून कोरीव काम करून तयार केलेला खांब पाहावयास मिळतो. या खांबात कड्या, लोलके किंवा घंटीसारखे आकार दिलेले आढळतात. मात्र हे कुठेही जोड न देता केवळ कोरीव काम करुन तयार केलेले असते.

नृत्य हे आदिवासी जीवनाचे महत्त्वाचे अंग. काही भागातील नृत्यात मानवाचे, पशू-पक्ष्यांचे मुखवटे परिधान केले जातात. कटोऱ्याच्या आकाराचा एक लाकडी तुकडा घासून छिनून त्यावर नाक, डोळे व ओठ कोरतात. डोळ्यांसाठी पांढरा रंग अथवा शिंपले, केसांसाठी गवत, लोकर व काथ्या वापरतात. मुखवट्यांना रंगवले जाते.

वाद्ये तयार करण्यासाठी लाकडाचा विविध प्रकारे उपयोग करण्यात येतो. लाकडाचा गुणधर्म म्हणजे नाद परावर्तित किंवा उत्पन्न करण्यास त्याचा मोठा उपयोग होतो. लाकडातूनच उत्पन्न होणारा नाद मृदू व मधुर असतो. आदिवासी आपल्या नृत्य-कलेसाठी लाकडापासून व भोपळ्यांसारख्या वस्तूंपासून, बांबूपासून ढोल, खुळखुळे, डमरु, पावे, तंतुवाद्ये बनवितात.


लाकडापासून तयार केलेल्या वस्तूंना आदिवासी जीवनात वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. त्यासाठी ते आंबा, महुवा, कुसुम, गोरखा, साल यांसारख्यी झाडे नष्ट करत नाहीत. अशाच एका झाडापासून बनविण्यात येणाऱ्या कंगवा-फणी या वस्तूंचे माडिया आदिवासींमध्ये असलेले महत्त्व आपण जाणून घेऊ या.



भारताच्या ओरिसा राज्यातील जुआंग जमातीचा बांबूचा अलंकृत कंगवा

फणी अथवा कंगव्याचा वापर माडिया, मुडिया जमातीत व इतर काही आदिवासींमध्ये प्राचीन काळापासून आहे. आदिवासी तरुण-तरुणींचे नटण्याचे व शृंगाराचे कंगवा-फणी हे वैशिष्ट्यपूर्ण आभूषण आहे. गोटुलमध्ये रोज हे तरुण-तरुणी कंगवा-फणीचा केस विंचारण्यासाठी, अंग खाजविण्यासाठी व डोक्यात खोवण्यासाठी वापर करतात. तरूण आपल्या टोपीत अथवा फेट्यात कंगवे खोवतात. तर तरूणी केसांमध्ये अनेक कंगवे आकर्षकरित्या लावतात. हे कंगवे त्यांना प्रियकरांकडून मिळतात. कंगवा मोडला तर अशुभ मानले जाते. मृत्यूनंतर त्या व्यक्तीसोबत कंगवा दफन केला जातो.

विवाहपूर्व काळात बहुतेक तरूणींजवळ खूप कंगवे असतात. विवाहानंतर मात्र फक्त नवऱ्याचा



भारताच्या अरुणाचल
प्रदेशातील अका जमातीच्या स्त्रीची केशभूषा.

कंगवाच डोक्यात ठेवून इतर पूर्वीच्या जोडीदारांना (प्रियकरांना) परत केले जातात.

बहुतेक सर्व कंगवे-फण्या मोहाच्या झाडापासून तयार केलेले असतात. त्यांच्यावर टिंबे, रेघा, वर्तुळे यांनी नक्षीकाम केले जावे एक कंगवा तयार करण्यास दोन-तीन तास लागतात.

बांबूचा वापर करुन विविध कलात्मक वस्तू तयार करण्यातही आदिवासी वाकबगार असतात. तट्टे, चटया, टोपल्या, मासे पकडण्याच्या जाळ्या इत्यादी वस्तू ते सहजरित्या करतात. बांबूच्या बारीक फाकांपासून तयार केलेले नक्षीकाम फारच सफाईदार असते. लांब दांडीच्या गवतापासून किंवा लव्हाळ्यापासून बारीक दोरी तयार करतात आणि त्याने खाट (लाकडी बाज) विणतात. ही वीण अत्यंत नरम व मजबूत असते. शिकारीसाठी जे धनुष्य तयार करतात त्याची दोरी याच तंतूची असते.

हिरव्या रुंद बांबूपासून बांबूचा डोळा किंवा गाठ ज्याठिकाणी असेल त्याच्या बरोबर खाली कापून ताडी गोळा करण्यासाठी, आंबील किंवा पाणी ठेवण्यासाठी नैसर्गिक बाटली तयार करतात. तेल ठेवण्यासाठीही त्याचा उपयोग होतो.

बांबूंना उभे कापून दोन भाग करुन त्याचा पन्हाळी सारखाही उपयोग करण्यात येतो. उंच झाडावर चढण्यासाठी शिडी, विहिरतून पाणी काढण्यासाठी बांबूचा पिकोरा याही वस्तू कलात्मक दिसतात.

**आदिवासी दैवते**

आदिवासींना कोणताही धर्म नसतो. त्यामुळे देवाची मूर्त कल्पना त्यांच्यात नसते. निसर्गच त्यांचा देव असतो. त्यांच्या दैव संकल्पनेत देवतांच्या मूर्ती नसल्याने डोंगर, नदी, दगड, ओंडके, विशिष्ट झाडे हीच त्यांच्या देवतांची प्रतीके असतात. उदाहरणार्थ, मोहाचे झाड हा त्यांचा देवच मानतात. कारण ते त्यांच्या प्रत्येक बाबतीत उपयोगी ठरते. त्यापासून दारु मिळते. अन्नपदार्थ मिळतात. औषधी उपयोग होतो. पत्रावळ्या, इरली बनतात. विवाहात मोहाच्या फांद्यांचा मांडव घालतात. मोहाच्या झाडाखाली देवाची स्थापना करतात. नवसाचे लाकडी घोडे मोहाच्या झाडाखाली ठेवतात. असे बहुविध उपयोग मोहाचे झाडाचे असल्याने ते कापले जाण्याची घटना क्वचितच पाहावयास मिळू शकते. म्हणूनच मोहाच्या झाडाचे संवर्धनाचे श्रेय आदिवासींनाच द्यावे लागेल.

आदिवासींचे देव हे दगडाचे किंवा लाकडाचे असतात. ते मातीच्या मडक्यात किंवा एखाद्या लाल

/ हिरव्या कापडात गुंडाळलेले असतात. गावाच्या वेशीवर किंवा मधोमध त्यांच्या देवतांची देवळे असतात. देऊळ म्हणजे एक अगदी छोटी दगडाची किंवा लाकडाची झोपडी असते. अथवा एखाद्या झाडाखाली सुध्दा त्यांचे देव असतात.

हिंदुंप्रमाणे निसर्गोपासना आदिवासींमध्ये दिसत असली तरी हिंदुंचे आणि आदिवासींचे देव मात्र वेगवेगळे आहेत. तसेच त्यांचे सण-उत्सव देखील वेगळे आहेत. राम, कृष्ण, हनुमान, गणपती ही हिंदू दैवते जरी आज आदिवासी गावांमध्ये दिसत असली तरी ती अगदी आलिकडच्या काळात हिंदुंबरोबर संपर्क वाढल्यावर आलेली आहेत.

निसर्गातील देवतांच त्यांची खरी दैवते आहेत. धान्य, कंदमुळे ही जमिनीतून येतात. त्यामुळे धान्यरुपातील कणसरीची पूजा ते करतात. नारनदेव, हिरवा देव, बडादेव (सूर्यदेव), इंदल (इंद्रदेव), वाघदेव ही देखील निसर्गाचीच रूपे आहेत. हीच खरी त्यांची दैवते. भिवसेन किंवा भिदायक हा कोलामांचा देव. मेघनाथ, रावण ही कोरकूंची दैवते. याहामोगी ही भिल्लांची देवी. या सगळ्या दैवतांची प्रतीके लाकडावर अथवा दगडावर कोरलेली आढळतात. थोडक्यात निसर्गातील पंचमहात्मतांना पूजणारी ही आदिवासी संस्कृती आहे.


जंगल आणि पर्यावरणाशी आदिवासींची नाळ जोडलेली असल्यामुळे त्यांच्या संस्कृतीवर त्याचा खोल ठसा उमटणे स्वाभाविकच आहे. माणसाच्या प्रगतीच्या पहिल्या टप्प्याचे स्वरूप पाहिले तर त्यात जंगलातून फळे, कंदमुळे गोळा करणे, निरनिराळी जनावरे पाळणे (पशुपालन), शेती यांसारखी कामे येतात. पूर्वीची अर्थव्यवस्था शेतीप्रधान होती व ती स्वयंपूर्ण होती. त्यामुळे जंगलानेच शेतीप्रधान समाजाला आश्रम दिला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

रामाला वनवास झाला तेव्हा त्या वनात राहणाऱ्या आदिवासींनीच त्यांना खरी साथ दिली होती. म्हणजे रामाने त्यावेळच्या जंगलाच्या अर्थव्यवस्थेचा लाभ घेतलेला आहे, असेच म्हणावे लागेल.

मात्र जंगलात राहून जंगलावरच गुजराण करणाऱ्या आदिवासीने जंगलाच्या अर्थकारणात कधी रस दाखविला नाही. जंगलाशी कधी प्रतारणा केली नाही. म्हणूनच कदाचित तो अजूनही प्राथमिक अवस्थेतच आपले जीवन जगत आहे.

(पूर्वप्रसिध्दी : 'विश्रांती' दिवाळी अंक २०१०)

• • •



मध्य भारतातील माडिया जमातीतील
मृताचा स्मृतिस्तंभ

# महाराष्ट्रातील आदिम आदिवासींची सामाजिक व अर्थिक स्थिती

**सुनिल चंदनशिवे**
**दुर्गेश बधे**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या सामाजिक अर्थिक जीवन व चालिरिती यामध्ये सारखेपणा आढळत नाही. प्रत्येक जमातीची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींचे सामाजिक जीवन त्यांच्या सभोवतालच्या भौगोलिक, अर्थिक आणि पारंपरिक रूढ झालेल्या सामाजिक आणि अर्थिक जीवनात वैशिष्ट्येपूर्ण विविधता असली तरी त्यांचा सांस्कृतिक धागा व समस्या समान आहेत. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ९% पेक्षा ही अधिक आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामध्ये भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख अदिवासी जमाती आहेत. कोलम, माडीया गोंड आणि कातकरी या केंद्रशासनाने 'आदिम जमाती' म्हणून अधिसूचित केलेल्या तीन जमाती आहेत. या जमातीच्या खूप समस्या आहेत. प्रस्तुत लेखामध्ये महाराष्ट्रातील कातकरी, कोलम आणि माडीया या आदिवासी जमातीच्या सामाजिक, अर्थिक स्थिती त्यांच्या समस्या आणि उपाय यांची विवेचना करण्यात येणार असून त्यासाठी अभ्यासाची खालील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१. महाराष्ट्रातील आदिम आदिवासी जमातीच्या सामाजिक आणि अर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. आदिम आदिवासी कातकरी, कोलाम आणि माडीया यांच्या लोकसंख्येचे विश्लेषण करणे.

३. आदिम अदिवासीच्या समस्या जाणून घेऊन उपाय सुचवणे.

**अभ्यासाचे गृहितक**

आदिम आदिवासी जमातीच्या सामाजिक व अर्थिक विकासासाठी अनेक समस्या असून त्या समस्या सोडवण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील आदिम आदिवासी**

महाराष्ट्र राज्यात एकूण ३५ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश), चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीयां, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनच्छादीत जिल्ह्यांमध्ये मुख्यत: अधिक आहे. महाराष्ट्रातील आदिम आदिवासी कातकरी, कोलाम आणि माडीया हे आढळून येतात. महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय आदिम जमातीची लोकसंख्या पुढील कोष्टकात दाखविलेली आहे.

### कोष्टक क्र. १ : महाराष्ट्रातील आदिम आदिवासींची लोकसंख्या

| अ.क्र. | आदिम जमाती | जिल्हा | जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | १९८१ | १९९१ | २००१ |
| १. | कातकरी/काथाडी | ठाणे | ५७४५९ | ७३७०० | ९१४२९ |
| | | रायगड | ७५६८० | ९३४८४ | १०३२४४ |
| | | रत्नागिरी | २१२६५ | ३४५२ | ६०३४ |
| | | पुणे | ८८८५ | १२.५४ | ११९३५ |
| | | नाशिक | ४४४४ | ५४३७ | ४१९४ |
| | | इतर जिल्हे | ६८७२ | १४०७६ | १५१८६ |
| | | एकूण | १७४६०२ | २०२२०३ | २३५०२२ |
| २. | कोलाम | यवतमाळ | ६५७०७ | ७६८०२ | ९३९३२९ |
| | | नांदेड | ३६९५३ | ४९५५६ | ५१६५३ |
| | | चंद्रपूर | ४९०३ | ३९६२ | ६३७६ |
| | | इतर जिल्हे | ११५१० | १७५२३ | २१६८८ |
| | | एकूण | ११८०७३ | १४७८४३ | १७३६४६ |
| ३. | माडीया गोंड | गडचिरोली | ११६२७३५ | १४४२९८६ | १५५४८९४ |
| | | इतर जिल्हे | -- | -- | -- |
| | महाराष्ट्र राज्य | | १४५५४१० | १७९३०३३ | १९६३५६२ |

आधार : भारतातील जनगणना १९८१, १९९१ व २००१.

**कातकरी आदिम आदिवासी :**

कातकरी आदिम आदिवासी हे दोन प्रकारचे आहेत. ढोर कातकरी आणि सोन कातकरी २००१ च्या जनगणनेनुसार कातकरीची महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या २३५०२२ होती. काथोडी किंवा कातकरी हे महाराष्ट्रातील खूप आदिम आदिवासी म्हणून ओळखले जातात. यांचे प्रमाण ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथे जास्त प्रमाणात दिसून येते. जास्त करून कातकरी हे काम म्हणून मजुरी करतात. त्यातील काही शिकार करणे, मासेमारी, खाण्यासाठी पक्ष्यांची शिकार करणे, शेती असे व्यवसाय करतात. खूपच कमी कातकऱ्यांकडे शेती आहे.

कातकरी हे अनुसूचित जमाती मध्ये येतात. कातकरी यांना ढोर या नावानेही ओळखले जात होते; कारण ते मेलेले (मृत) जनावरे ओढून नेत होते. गावाच्या बाजूला नेऊन त्याचा अन्न म्हणून वापर करायचे. कातकरी यांची लग्नाची पध्दती वेगळीच होती. लग्न किंवा विधी सोहळ्यासाठी कातकरी जमातीचे लोक ब्राह्मणांना कधीच बोलावत नसत. त्यांच्यामध्ये एकत्र कुटुंब पध्दती दिसून येते.

## कातकरी पंचायतीचे वैशिष्ट्ये

पारंपरिक कातकरी पंचायतीमध्ये ३ ते ५ सदस्य आणि ते गावातील लोकांकडून निवडले जात. काही एकदम महत्त्वाचे काम असेल तरच पंचायत भरली जात असे. त्यासाठी कोणताही निश्चित वेळ किंवा ठिकाण नव्हते.

व्याभीचार, तलाक, भांडण, इतर घरासंबंधी भांडण असे प्रश्न पंचायतीकडून सोडविले जात. शिक्षा म्हणून गुन्हेगाराकडून दंड म्हणून जास्त रक्कम वसूल केली जात. पंचायत हे आदिवासी लोकांच्या विकासासाठी नेहमी सल्ला व विकासात्मक कामे करत. कातकरी आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्यामुळे निरक्षरता जास्त प्रमाणात दिसून येते. त्याठिकाणी विजेचा प्रश्न, पाण्याची उपलब्धता असे विविध प्रश्न आहेत.

## कोलाम आदिम आदिवासी

महाराष्ट्रातील कोलाम हे आदिम आदिवासी आहेत. त्यांचे जास्त प्रमाण नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये दिसून येते. २००१ च्या जनगणनेप्रमाणे त्यांची लोकसंख्या १७,३६४६ एवढी आहे. बांबूपासून टोपली तयार करणे, तसेच हंगामी काळात दुसऱ्याच्या शेतात मजूर म्हणून काम करणे. यांच्यामध्ये लहान आणि एकत्र कुटुंब पध्दती दिसून येते. कोलाम हे पंचायत ला 'पंचमंडल' असेही म्हणतात. त्यांच्या अध्यक्षास 'नायक' किंवा 'नेकून' म्हणतात. कोणताही कार्यक्रम, लग्न सोहळा आणि पंचायतचा तो मुख्य असतो. त्यानंतर महाजन हा उपअध्यक्ष असतो. कारभारी हा पंचायतचा सेक्रेटरी असून तो पैसे गोळा करण्याचे काम करतो. विविध तक्रारी, भांडण पंचायत मंडलकडून सोडवले जातात. गुन्हेगारास शिक्षा म्हणून जमातीतून बाहेर / वाळीत टाकले जाते. तसेच गावातील विहिरीतील पाणी पिण्यास त्यास मनाई केली जाते. पंचायत सदस्यांची निवड ही त्यांचे वय, अनुभव, प्रशासकीय गुणवत्ता या आधारावर गावातील लोकांकडून केली जाते. कातकरी आदिम आदिवासीच्या तुलनेत कोलामचे निरक्षरतेचे प्रमाण थोडे कमी आहे. त्यांच्या कुटुंबात ७ ते ९ व्यक्ती दिसून येतात. त्याठिकाणी विजेचा प्रश्न आहे. सरकारच्या खूप काही योजना त्यांच्या विकासासाठी राबविल्या जातात; परंतु माहितीच्या अभावामुळे त्या स्थानिक पातळीवर पोहचत नाहीत.

## माडीया गोंड आदिम आदिवासी

माडीया ही गोंडांची उपजात आहे. ही जमात महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात जास्त प्रमाणात आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जमातीची एकूण १५,५४,८९४ संख्या होती. गोंड हे तीन प्रकारचे आहेत. जसे की राज गोंड, दादेस आणि मोकासीस.

## माडीया जमातीची वैशिष्ट्ये

माडीया आदिवासी जमातीची वेशभूषा ही इतर जमातीपेक्षा वेगळ्या प्रकारची आहे. त्यांची भाषा गोंडी म्हणून ओळखली जाते. त्यांच्या आहारामध्ये भात घेतात. माडीया जमातीचे विविध सण, उत्सव आहेत. जसे की कुमरी, छुकला, नोवा, पोरा, दसरा, दिवाळी, पुसी, डोगरी, सेयाती, पोला आदी. त्यांच्या मते सर्वांमध्ये आत्मा आहे जसे की, सूर्य, चंद्र, चांदण्या, पृथ्वी. माडीया जमात देवावर विश्वास ठेवते. माडीया हे जास्त करून घनदाट जंगलात राहतात. त्यातील काही गावे ही रस्त्याच्या कडेला आहेत. व्यवसाय म्हणून शेतमजुरी, मासेमारी, शिकार करणे, अशी कामे करतात. शिक्षणापासून वंचित असल्याने त्याठिकाणी निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे.

## आदिम आदिवासी जमातीच्या सामाजिक समस्यचे स्वरूप

पश्चिम महाराष्ट्रातील इतर आदिवासी तसेच विविध जमातीचे अदिवासी यांना सामाजिक श्रेणी कमी लेखले जाते. कारण विशेषत: ते जनावरांचे, माकडांचे, कोल्हा यांचे मांस खातात, म्हणून त्यांना सामाजिक कलंक म्हणून संशोधण्यात येते. शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. यासाठी विविध सरकारने त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध कार्यक्रम, योजना, धोरण आखण्याची गरज आहे. त्यांच्या विचारांमध्ये न्यूनगंड दिसून येतो. कारण त्यांची आहारांची सवय आणि गरिबी. सरकारच्या विविध योजना आणि संस्थांचे कार्यक्रम स्थानिक पतळीपर्यंत पोहोचण्यात अभावा दिसून येतो व या आदिवासींचे सर्रास भटकी जीवन दिसून येते. कातकरी आदिवासी हे इतर जमातीतील आदिवासींमध्ये मिसळत नाहीत. ते स्वत:चे वेगळे कायदे व नियम मानतात. माडीया आणि कातकऱ्यांच्या तुलनेमध्ये सामाजिक जाणीवजागृती ही कोलाम जमातीमध्ये जास्त प्रमाणात दिसून येते. भौगोलिक दृष्ट्याही त्यांचे स्थान हे वेगळे आहे. त्यांना मराठी बोलणेही फार कठीण जाते. जवळपास आदिवासींच्या विकासासाठी सरकारच्या ३०० विकास योजना आहेत. आदिवासींना याविषयी माहितीच्या अभावामुळे त्या पूर्ण त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत.

## आदिम आदिवासी जमातीच्या अर्थिक समस्येचे स्वरूप

### १) दारिद्रय रेषेखालील कुटुंबे

आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था यांनी केलेल्या २००१ च्या सर्वेनुसार जवळपास ९७.४% कातकरी, ९२.७३% कोलम आणि ९१.०८% माडीया आदिवासी लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात. त्यांची आकडेवारी खाली कोष्टकात स्पष्ट केली आहे. (कोष्टक क्र. २)

**कोष्टक क्र. २**

| अ.क्र. | आदिवासी | घरातील एकूण व्यक्तींची संख्या | बी.पी.एल. मधील एकूण व्यक्तींची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | कातकरी | १४८६२ | १४४३७ | ९७.१४% |
| २. | कोलम | १४१८२ | १३१५१ | ९२.७३% |
| ३. | माडीया | १३३५१ | १२१६० | ९१.०८% |
| | एकूण | ४२३९५ | ३९७४८ | ९१.०८% |

२) शेती व्यवसाय करण्यासाठी कमी जमीन असल्याने शेती उत्पादन खूप कमी प्रमाणात आहे.

३) आदिवासींच्या घरांची स्थिती बिकट आहे. घरे ही कच्या विटा, बांबूची, लाकडांची बनलेली आहेत.

४) माडीया जमातीच्या लोकांची वेशभूषा कातकरी आणि कोलामांच्या तुलनेत खूप खालावलेली आहे.

५) शिक्षणाचे प्रमाण कमी, कारण शाळा महाविद्यालयाचे प्रमाण कमी. त्यामुळे निरक्षरता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

६) पायाभूत सुविधांमध्ये विजेचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, आरोग्य असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर भेडसावत आहेत.

**समारोप**

महाराष्ट्रात एकूण आदिवासी लोकसंख्या ९% पेक्षा अधिक आहेत. आदिम आदिवासींचे सामाजिक तसेच अर्थिक प्रश्न सोडवण्याची आवश्यकता आहे. त्याठिकाणी वाहतूक, दळण-वळण, विद्युत पुरवठा, आरोग्य सुविधा, शिक्षणप्रसार करण्याची गरज आहे. सरकारच्या आदिवासी विकासासाठी खूप योजना आहेत. त्या स्थानिक पातळीपर्यंत पोहचायला हवे. जेणेकरून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी त्यांच्या उत्पादीत वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून द्यावयास हवी. शिक्षणाचा प्रसार करून गावोगावी शाळा, महाविद्यालये बांधण्यासाठी सरकारकडून विशेष अनुदानाची गरज आहे. त्यांचे शहराकडील आकर्षण वाढल्यानंतर त्यांच्यामध्ये मनोवैज्ञानिक, सामाजिक, अर्थिकदृष्ट्या विकास होईल.

• • •

# आदिवासी भागातील आंबे लागवड (सुरगाणा तालुका)

**ना. सी. पाटील**

सुरगाणा प. भाग उंबरठाण येथे २ ऑक्टोबर १९५४ रोजी ३६ मैल पायी प्रवास करुन पोहोचलो. १५ दिवस परिसरात फिरुन १५ मुले आणि ४ मुली जमा केली आणि एका पर्णकुटीत मुंबई राज्याचे पहिल्या आश्रमशाळापैकी डांगसेवा मंडळाची पहिली आश्रमशाळा सुरु केली. तातडीने शिक्षणाधिकारी श्री. सेवलेकर, उपसंचालक श्री. चौधरी येऊन गेले. डांगसेवा मंडळाचे सेक्रेटरी बाळासाहेब अग्नीहोत्री, श्री. दादासाहेब बिडकर, श्री. कचरुभाऊ राऊत यांच्या चकरा सुरु झाल्या. श्री. हरीभाऊ महाले तर जवळच करंजुल येथे शिक्षक, त्यामुळे दर शनिवारी, रविवारी आमच्या भेटीगाठी होत होत्या. शाळेला जमिनी मिळविल्या. इमारती उभ्या राहिल्या. कंपाऊंड केलेले त्यामुळे लोकमानसात प्रतिमा लवकरच उंचावली. परिसर पाहून एकलव्य आश्रमशाळा असे नावही मी देऊन टाकले. ३ वर्षात शाळा स्थिरावली. विद्यार्थ्यांच्या पायी सहली निघावयास लागल्यामुळे जनसंपर्क वाढला.

सन १९५७ साली २५ मैलांवर असलेले वघई रेल्वे स्टेशन गाठून ३०/३५ मुला-मुलींची सहल बिल्ली मोरीया येथे नेली. शाळेचा कामाठी व त्याची पत्नी बरोबर असल्यामुळे मुला-मुलींना सांभाळण्याचा प्रश्न मिटला. मुले-मुली संख्या ४ थी पर्यंतच होती. परंतु अत्यंत आज्ञाधारक असावयाची. निवासी शाळा असल्यामुळे आवडीचे तुरीचे वरणभात, नागली भाकर, चटणीचे जेवण, भाजी असल्यामुळे मुलांमध्ये प्रसन्नता जाणवत होती. त्यात सहलीचा प्रवास बिल्ली मोरीया येथे प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते आमचे टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे वर्गमित्र शशिकांत, यांचे वडील दादासाहेब अभ्यंकर यांचे सेव्य सेवकां आश्रमामध्ये निवास येथे असलेल्या पवन चक्कीचे आकर्षन शुभ्रखादी धारी ध्येयवादी कार्यकर्ते परिसर एकदम स्वच्छ अशा अभ्यंकर परिवाराने आमची ३०-३५ मुलांची जेवण-निवासापासून अत्यंत काळजी घेतली. एवढेच नव्हे तर परदेशातील वस्तू वापरावयाच्या नाहीत, असा दृष्टीकोनही दिला. स्वावलंबनाचे महत्व पटवून दिले, आणि वृक्षारोपणात आंब्याची झाडे लावा. असा सल्ला दिला, तो मी तातडीने मानला. राजापूर, हापूस, लंगडा, हापूस विविध प्रकारची २५ कलमे रु. १०० देवून नर्सरीतून खरेदी केली आणि प्रत्येक विद्यार्थ्यांचे हातात १ रोप कलम देवून शाळेत परत जाईपर्यंत सांभाळण्याचे बजावले. मुले आज्ञाधारक, त्यांना बिलीमोरीया ते वघर्ड पॅसेंजर वा झुकझुक प्रवास त्यानंतर पायीच प्रवास रस्त्यात रगतविहिर येथे रात्रीचा मुक्काम करावा लागला. रगतविहिर येथे दोन शाळा, एक जि. प. ची मराठी शाळा आणि दुसरी वाजदा येथील प्रवीणभाई यांच्या जंगल सोसायटीची गुजराथी शाळा. त्यामुळे उतरण्याची सोय-जेवणाचे काय ? तर गुजराथी शाळा समर्थक गंगाजी सहारे यांचे दार रात्री ९ वाजता ठोठावले. सर्व मुलांचा घरावर मोर्चाच. मागणी काय तर जेवणाची सोय करा. झोपेच्या डुलकीत असणाऱ्या गंगाजी सहारे

या पती-पत्नींनी घरातून १ पायली तांदूळ १ किलो डाळ, मीठ मिरची, पाण्याचा हंडा काढून ताब्यात दिला आणि म्हणाले की, यासाठी मी गुजराथी शाळा काढली की... गुजराथी सोसायटी इमारत बांधून देत आहे ना ? म्हणून २ शाळा काढल्या, नाही तर कोणतीही एक राहील शाळा आणि दुसरी आहेच की, तुमच्या सारख्यासाठी ''धर्म शाळा या धर्मशाळेत स्वयंपाक करुन जेवण झाले, तसेच शांततेत झोपी गेलेत.''

आंब्याची रोपे सकाळी पाहिल्यावर मात्र श्री. गंगाजी सहारे खूश झाले. उंबरठाणला पायी ११ वाजता रोपासहीत पोहोचलो. श्री. जगनशेट वाणी यांनी स्वागत केले. आश्रमात प्रवेश केल्यावर प्रथम झाडे कुठे आणि कशी लावायची याची आखणी करुन दिली. मुलांनीच खड्डे खोदून शेणखतासह रोपे लावली. ज्यांनी बिली मोरीया वरुन सांभाळून आणली. त्याचेवरच पुढील नियोजन सोपविले. त्यांच्या नावाच्या पाट्या अर्ध्या पुठ्ठ्यावर त्यांचे हस्ताक्षरातच लागल्या. मुळात मी शेतकऱ्याचा मुलगा. अजिंठा डोंगरात घरी स्वत:ची थोडी शेती. शाळेचीही शेती होतीच. कोणत्याही कलेकडे लक्ष न देता शेताच्या नवनिर्मितीने मला आनंद वाटावयाचा.

टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या १९५१ च्या वाङ्कय प्रवेशाला (मॅट्रीक्युलेशन) ऐच्छिक विषय ॲग्रीकल्चरल घेऊन मी पास झालो. एस. एस. सी. नंतर ॲग्रीकल्चरल शाळेला माझ्या विद्यार्थ्यांनी जावे हा प्रयत्न. माझ्या मुलांनाही ॲग्रीकल्चरल दिशा दिली. परंतु जेमतेम एक वर्षानंतर त्यांनी साईड बदलली.

अशा विविध प्रकारच्या गुजराथी आंब्यांचे संरक्षणाकडे अधिक लक्ष देऊ लागले. विद्यार्थी दररोज सायंकाळी जेवणापूर्वी नियमित पाणी घालू लागले. झाडांची काळजी घेऊ लागले. त्यांचे झाडांची प्रगती स्वत:हून सांगू लागले. योग्य ती खते दिली. संरक्षणार्थही सोय करुन दिली. संयुक्त महाराष्ट्राचे १९५७ च्या आंदोलनाचे काळात लावलेली ही झाडे त्या चळवळीप्रमाणेच बहरत गेली. मुलांची आवडती झाली. त्यामुळे आता संरक्षणाचा प्रश्न नव्हता. शाळेच्या आवाराला पूर्ण तोरेचे कंपाऊंड असल्यामुळे आपोआप संरक्षण मिळाले. माझी चिंताच दूर झाली. पुढे १९६० मध्ये उंबरठाण शाळा सोडली. वसतीगृह व शाळांचा सुपरवायझर झाली. श्री. दादासाहेब बिडकर, श्री. बाळासाहेब अग्निहोत्री हे स्वातंत्र्य चळवळीतले कार्यकर्ते, रात्री बेरात्री हातात काठी घेऊन पायी प्रवास करण्यात मलाही थकवायचे. तथापि माझेवरही अविश्रांत श्रम करणाऱ्या प. पू. पंधे गुरुजी, स्वा. सैनिक शंकर विनायक ठकार, स्वा. सैनिक काकासाहेब बरवे, धुळे यांचे संस्कार डांगसेवा मंडळात येण्यापूर्वी झाले होते. त्यामुळे मी काही दमत नव्हतो. प्रवासात दोघांचा सहवास चांगलाच लाभला आणि परिपक्वता निर्माण झाली.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र निर्मिती झाली डांग जिल्हा गुजराथला जोडला गेला. ''बारागांव डांग'' म्हणजे सुरगाणा प. भाग, मात्र डांगसेवा मंडळाच्या चळवळीमुळे महाराष्ट्रात राहिला, तथापी डांग सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांची पांगापांग झाली. अनेक कार्यकर्ते बाहेर पडले. सुपरवायझर काळात मात्र मी 'राष्ट्र भाषा पंडीत हिंदी शिक्षक सनद परिक्षेचा

अभ्यास करुन पास झालो. त्यामुळे हिंदी शिक्षकांसाठी आमचाही भाव वाढला. डांगसेवा मंडळास नमस्कार ठोकून सर्वोदय योजनेत प्रवेश केला. राजूरला अधिक्षक / शिक्षकाचे काम नियमापेक्षा अधिक वेतन देऊन मिळाले. उत्साहाने कामाला लागलो. शैक्षक्षिक पात्रताही वाढविली. यावर मुख्याध्यापक शीपही मिळाली. बारागांव पिंप्री तालुका सिन्नर मुख्याध्यापक पदामुळे मधून मधून डांग सेवा मंडळाशी संपर्क येत गेला. दादांशी आदराने चर्चा करीत गेलो.

**आमदार कचरुभाऊ राऊत यांचेसह उंबरठाण प्रवास**

एकदा १९६८ मध्ये डांग सेवा मंडळाचे कार्यकर्ते आमदार कचरुभाऊ राऊत उंबरठाण येथे जाण्याचे तयारीत असताना डांगसेवा मंडळाचे अध्यक्ष दादासाहेब बिडकर यांना मी प्रश्न केला की, दादा, हजार दोन हजार उत्पन्न दरवर्षीचे आंब्याच्या झाडांचे मिळत असेल ? दादाने नेहमीच्या त्यांचे स्वभावामुळे मला मुर्खात काढले. काय बोलतो आहे, चांगले १० हजाराचे उत्पन्न दरवर्षी मिळते, मुलेही खूप असतात. मुल्हेरचे मुख्याध्यापक श्री. चंद्रात्रे सर यांनी एका आंब्याच्या झाडाला कान लावला तर ते सांगत होते की, ''नाशिक पाटील - नाशिक पाटील'' असा आवाज झाडाच्या बुंध्यामधून ऐकू येत होता. अर्थात ते विनोदाने बोलले, मात्र असे स्वत:हून मला सांगितलेवर खूपच हंसू आले आणि मी तातडीने कचरुभाऊ राऊत यांचेबरोबर उंबरठाणला गेलो. एक दिवस मुक्काम केला. तथापि ही वेळ दिवाळीच्या सुट्ट्यांची, त्यामुळे आंब्याची झाडे पाहून खूश झालो. मात्र एकही आंबा मिळू शकला नाही. ''बाबा बोता है, पोता खाता है'' या म्हणीची आठवण पूर्णपणे झाली आणि माझे श्रमाचा लाभ मला एकही आंबा पाहता आला नाही, याची खंतही वाटली.

**१९९० नंतर पुन्हा डांग सेवा मंडळात भ्रमण**

जून ९० ला सेवानिवृत्त झालो. तीन संस्थांनी आमचेकडे निमंत्रणे दिली. तथापि डांगसेवा मंडळामुळे मी १ ऑगस्ट पासून पुन्हा मंडळात प्रवेश केला. सुरगाणे तालुक्यातील माजी विद्यार्थ्यांच्या उंबरठाण येथे मेळावा झाला. वर्धापन दिनानिमित्ताने (१६/१०/१९९०) भरविला. माजी विद्यार्थ्यांचा शाळे-बद्दलचा जिव्हाळा पाहून खूप समाधान वाटले. विचाराने कट्टर कम्युनिस्ट कार्यकर्ते, पूरंतु डांगसेवा मंडळाच्या शाळांबद्दल त्यांचा अत्यंत जिव्हाळा जाणवला. मेळाव्यात मागणी एकच 'उंबरठाणला ज्युनिअर कॉलेज काढावे', याबाबत संस्थेतर्फे दोन वेळा प्रस्ताव देऊनही शिक्षण खात्यास जागा आली नाही. दोन पोस्ट बेसिक आश्रमशाळा आंबेगण, सुळे येथे मात्र मिळविल्या. परंतु जुनिअर कॉलेज मिळाले नाही, याची खंत वाटते.

उंबरठाण परिसरात मात्र आता म्हैसखडाक, गुही, फणसवाडा, रगतविहिर, चिंचवाडा, कुकुडणे परिसरात फिरु लागलो आणि बऱ्याच गावात आंब्याची लागवड पाहून समाधान वाटले. जरा मागे वळून शोध लावला तर उंबरठाण आश्रमशाळेचे नाव आंबे लागवडी प्रचाराबाबत पुढे येते. कोणताही प्रचार न करता आंबे लागवडीची फोफावलेली ही चळवळ आश्रमशाळा कार्याचे यशाचे गमक आहे. अशा माझ्या या भागातील शैक्षणिक-सामाजिक कामामुळे एका दिवशी एका आमदाराचा फोन आला की, ''गुरुजी सुरगाणे तालुक्यातून'' आदिवासी सेवक '' म्हणून तुमची निवड झाली आहे, आणि सुरगाणाचे आमदार यांचा आणि

तुमचा परिचय नसताना त्यांनी सांगितले की, माझे जन्मापुर्वीचे उंबरठाण आश्रमशाळेचे काम उभा करणारा कार्यकर्ता त्याचे नावास माझी पूर्णपणे संमती आहे. या आमदाराचा माझा काहीच परिचय नाही. त्यांना मी फक्त सरकारी कार्यक्रमाचे वेळी पाहिले. मुंबईला एकवेळ त्यांना भेटायला गेलो तथापि ते मुंबईत नव्हते. त्यांचे खोलीवर त्यांचे मित्राबरोबर मुक्काम ठोकला आणि आमदाराबद्दल आदराची भावना व्यक्त केली.

युतीचे राज्य म्हणजे वाटणीचे राज्य. या राज्यात माझ्यासारख्या समाजवादी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यास पुरस्कार मिळाला, हे कसे काय घडले अनेकांनी प्रश्न केले. मात्र त्यांना उत्तर मी देऊ शकलो नाही. कामाचे मोजमाप करण्यासाठी राज्य कुणाचे हे महत्वाचे नाही. राज्य आघाडीचे असो की युतीचे काही प्रमाणात चांगले कार्यकर्ते भेटतात. अधिकारीही भेटतात. मात्र चांगल्या माणसाचे सरासरी प्रमाण कमी होत आहे. ही खंत जाणवते.

अशाच प्रकारचे कार्य लिंगदेव ता. अकोले येथील १० वर्षात मी उभे केले. शाळेला जमीन मिळविली. नानासाहेब गोरे येणार म्हणून त्या जमिनीच्या परिसराला घायपाताचे कंपाऊंड करुन घेतले. ठराविक अंतरावर विविध प्रकारची ७५ झाडे लावली. नानासाहेब आले सर्व गावकरी जमले. शाळेचे स्नेह-संमेलनात ३ तास सहभागी झाले. रात्री १० वाजता कोपरगाव येथे जाहीर सभा झाली. ४ दिवसांनी मामा गवारे यांचे पत्र आले की, नानासाहेबांनी तुमचे कार्याची फार स्तुती केली आहे. माझे यशाचे गमक त्यातच आहे. नानासाहेबांनी साधनेतही माझ्या कामाबाबत लिहिले आहे. उघडे डोंगर झाकणेसाठी सामाजिक वनीकरण अधिकारी श्री. शेवेकरसाहेब माझे मळगांव खरबडी जवळचे असलेमुळे त्यांचे मार्फत शाळेच्या परिसरात डोंगर भागात सामाजिक वनीकरणास चालना दिली. आज या डोंगरांना बराच दिलासा मिळालेला पाहावयास मिळतो. माझे सहकारी प. सा. चौधरी तर चांगलेच शेतकरी. त्यांनी आंबे लावले व प्रयोग यशस्वी करुन दाखविला. माझ्या मुख्याध्यापकपदाचे कामापेक्षा या कामावरच ते अधिक बोलतात. आणि एस.एस.सी. नंतर मुलांनी ॲग्रिकल्चरकडे जावे, या माझ्या विचाराचा पाठपुरावा करतात.

या कार्याबद्दल मी कधी लिहिले नाही. तथापि फारसे कोणास सांगत नाही. अकोले जि. अ. नगर येथे वसतीगृह अधिक्षक असताना तेथेही वृक्ष रोपणाचे काम केले आहे. आज या परिसरात असलेली वृक्ष लागवड माझे सहकारी श्री. गुजर गुरुजी व मी केली आहे.

महाराष्ट्र राज्य वनमंत्री यांचेकडे एकदा या कार्यासाठी मदत करावी म्हणून अर्ज केला, तर उत्तर आले की, बजेटमध्ये तरतूद नाही. (१९६५) त्यामुळे ठिकठिकाणी उभे केलेले वृक्षारोपण, सामाजिक वनीकरण उभारणेचे काम मी प्रामुख्याने विद्यार्थ्याचे बळावर केले. त्यांचेवर संस्कार माझे प्रयोगामुळे झाले. त्या संस्कारांचा शेतकऱ्याचे मुलांनी जरुर उपयोग केला असल्याचे माझे लक्षात येते. शिक्षकी पेशातील हे माझे सर्वात मोठे समाधान आहे असे मी मानतो.

विद्यार्थ्यांना वर्गात शिक्षकाने काय शिकविले हे त्याचे लक्षात माजी विद्यार्थी झाल्यावर राहात नाही. मात्र विद्यार्थ्यांवर काय संस्कार केले, त्याचे अडचणीत

काय मदत केली हे मात्र विद्यार्थी विसरु शकत नाही. त्यामुळे वयाच्या ८० व्या वर्षी देखील माजी विद्यार्थी भेटल्यावर मनाला प्रसन्नता वाटते.

शेवटची ५ वर्षे मला मोठ्या शाळेवर जावे लागले. ही शाळा उभारण्याचे श्रेय खरे श्री. भा. वि. जोशी यांचे. सय्यद पिंपरी येथील साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श विद्यालय श्री. भा. वि. जोशी यांचेमुळे नावाजले. त्यामुळे त्यांनी खूप कष्ट करुन शाळेला ५ एकर जमीन मिळविली आणि संस्थेचे मदतीने साधी; परंतु सुंदर वाटणारी इमारत उभी केली. आणि त्यांची बदली नोव्हेंबर १९८५ ला नाशिकरोडला झाली. त्याठिकाणी मला प्रमोशन मिळाले. जेथे नोकरी तेथील रहिवासी ही माझी भावना त्यामुळे येथे प्रथम पाण्याचा प्रश्न सोडवावा म्हणून सखाराम गुरुजी यांनी पाण्याची टाकी आणि फाटकासाठी मदत केली. येथे वृक्षारोपण करावे, शाळा फुलवावी असे वाटल्याने मी बुलढाणा भारत विद्यालयाचे संस्थापक श्री. दिवाकर आगासे यांना लिहिले. त्यांनी एक नव्हे तर जिल्ह्यातील १० शाळांना नर्सरी योजनेखाली साहित्य रुपाने रु. ५० हजारांची मदत केली आणि झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेतला. तथापि पाण्याची अडचण भासू लागली. मुख्यमंत्री शरद पवार यांचे वाढदिवसानिमित्त त्यांना भेट देण्याऐवजी त्यांनाच आवारात वृक्षारोपण करण्यासाठी मदतीची विनंती की, गंमत काय सांगू, १५ दिवसात कोणाचीही मध्यस्थी न करता रु. २५ हजारांचा चेक पोस्टाने आला. त्यामुळे उत्साह वाढला. पाण्याची मोठी टाकी. आवारात वृक्षारोपण, झाडांना पाणी देण्याचे नियोजन करण्यासाठी उभी राहिली. निसर्गरम्य वातावरणात पाहून किंवा ऐकून माझी शालेय वार्षिक पत्रिका वाचून आजचे आमदार श्री. उत्तमराव ढिकले यांचे शब्दामुळे ७५ हजारांची कु. सुफाने साखर कारखाना चेअरमन श्री. मालोजीराव मोगल यांनी मदत केली. संस्थेने देखील याबाबत लक्ष घातल्यामुळेही रक्कम शाळेचे सभागृहासाठी राखून ठेवली. सेवानिवृत्त ३० जानेवारी १९९० ला झालो. तथापि शिक्षणाधिकारी माध्यमिक श्री. अजित देशपांडे यांचे शिफारशीमुळे वर्षअखेर पर्यंत मुदतवाढ मिळाली आणि जून ९० मध्ये सत्कार स्वीकारुन नाशिक निवासी बनलो आहे. संस्थेने याकामी सहकार्य केले. संस्था पदाधिकारी यांचे सहकार्यामुळेच रचनात्मक, शैक्षणिक कार्यात यशस्वी झालो.

सदर शाळेचे परिसरात वृक्षारोपण, सामाजिक वनीकरणाचे काम वाढावे याकडे मी मधून मधून लक्ष दिले आणि सदर कामाची पाहणी सामाजिक वनीकरण अधिकारी नाशिक यांनी केल्यावर फार समाधान व्यक्त केले आहे.

उंबरठाण येथील आंबे लागवड योजनेचे सर्वेक्षण करण्यास मी डांगसेवा मंडळाचे कार्यकर्ते श्री. ज्ञानेश्वर गाजरे यांचेकडे सोपविले. ५० वर्षे सुमारे ४० शेतकरी यांनी या परिसरात आंबे लागवड केली आणि भाग समृध्द केला. लागवड अधिकारी श्री. निकम यांनी तर उंबरठाण आश्रम प्रयोगामुळे सुरगाणे आंबेमय झाला आहे असा अभिप्राय व्यक्त करुन वरिष्ठ अधिकारी यांना रिपोर्ट केला. यातच मला खरे समाधान आहे. शैक्षणिक कार्याबरोबर पर्यावरण व सामाजिक याचा समन्वय मी आयुष्यात साधला आहे याचे मला समाधान आहे. त्यामुळे माझे जीवन समृध्द झाले आहे, अशी माझी धारणा आहे.

• • •

# आदिवासी व ग्रामीण भागातील सक्रिय समाजवादी
## राष्ट्र सेवा दलाचे बिन्नीचे कार्यकर्ते

**श्री. ना. सी. पाटील**

### महाराष्ट्र समाज सेवा संघ नाशिक संस्था निर्मितीसाठी धडपड

भाषावार प्रांत रचनेचे तत्त्व १९५६ मध्ये मंजूर झालेनंतर भारतात विविध भाषांचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे यासाठी देशात प्रयत्न झाले आणि मुंबई द्विभाषिक मुंबई राज्य संपविण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेने कंबर कसली, त्यासाठी मोर्चे आंदोलने झाली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेसाठी १०५ कार्यकर्ते बळी गेले. स्वातंत्र मिळाल्यानंतर जो उत्सव साजरा करण्यात आला होता तेवढाच उत्सव १ मे १९६० रोजी महाराष्ट्रात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र स्थापनेसाठी आठ-दहा वर्षे महाराष्ट्रात विविध भागात लढे झालेत; त्यापैकी डांगचा लढा ही नानासाहेब दीक्षीत यांच्या कर्तृत्वाने लढला गेला. सुरगाणा-डांग-धरमपूर सीमेवर उंबरठाण असल्यामुळे आणि डांग सेवा मंडळाचे कार्यकर्ते या लढ्यात सहभागी झाल्यामुळे पर्यावरने सुरगाणा पश्चिम भागातील बारागांव डांग लढ्यासाठी सुरगाण्याचे शंकरराव गवांदे, कळवणचे चंद्रसेन कळवणकर या प्रजा समाजवादी कार्यकर्त्यांच्या सहवासामुळे या ना. जाधव, माधवराव लिमये, एस. एम. जोशी या समाजवादी कार्यकर्त्यांचा सहवास मला लाभला. कृष्णराव धुळप, आचार्य अत्रे, दादासाहेब बिडकर, दादासाहेब पोतनीस यांचे झंझावती दौरे डांग भागात सुरु झाले. हा काळ म्हणजे मंतरलेले दिवसच समजावयाचे. या मंतरलेल्या दिवसात विविध वक्त्यांची भाषणे, तमाशे, लोकनाट्य यातून शाहीर अमर शेख, अण्णाभाऊ साठे, गव्हाणकर यांचे जन-जागृतीचे पथनाट्य, लोकनाट्य यामुळे समाज चांगलाच जागृत झाला. ढवळून निघाला. त्यांचेबरोबर अनेक शाहीर या लढ्यात सहभागी झाले.

### महाराष्ट्राची सामाजिक व राजकीय परिस्थिती

१९५६ च्या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना साथी एस.एस. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात झाली आणि जिल्हावार धुरंधर राजकीय नेत्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हावार कमिट्या स्थापन करण्यात आल्या. नाशिक जिल्ह्यात समन्वय समितीचे प्रवर्तक साथी माधवराव लिमये अग्रस्थानी होते. त्यांनी शे. का. पक्ष, रिपब्लिकन पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष यांना एकत्र आणले. समितीचा इतका जोर वाढला की १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचे कर्मवीर भाऊसाहेब हिरे केवळ ५१ मतांनी निवडून आले. नाशिक जिल्ह्यात समितीचे १०-१२ आमदार

निवडून आले. आमचे संस्थेतील नागशेवाडी येथे व्हालंटरी शाळेवरचा शिक्षक, आमचा मित्र रामदास पांडू बागुल सायकलने प्रचार करुन चांदवड द्वि सदस्य मतदार संघातून समितीच्या तिकिटावर आमदार म्हणून निवडून आला. प. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार कॉंग्रेसच्या रथी-महारथींना पाडून निवडून आले. नाशिकमधून एक नामांकित महाराष्ट्र तोफ म्हणून प्रसिध्द असणारे खासदार यांचा पराभव करून कर्मवीर दादासाहेब गायकवाड निवडून आले. मालेगाव मधून एका प्रसिध्द गांधीवादी विधायक कार्यकर्त्याला पाडून या. ना. जाधव निवडून आले. जात-पात-धर्म सर्व जमिनीत गाडून गोरगरीब, आदिवासी दलित, शेतकरी-किसान यांनी भरभरून मते संयुक्त महाराष्ट्र समितीस दिली. मुंबई-पुणे येथून प्रचारास आलेल्या कार्यकर्त्यांच्या रोजच्या सोयी ज्या करण्यात आल्या त्यावेळी जो उत्साह सामान्य माणसांनी दाखवला तेवढा उत्साह अजुनतरी कोणत्याही निवडणुकीत माझ्या पाहण्यात आला नाही. त्यावेळी जी लोकजागृती झाली त्याला मोज नाही. या लोक जागृतीचे काही विधायक कार्यकर्त्यांनी चिंतन केले. या चिंतनाकडे माझेही लक्ष वेधले गेले. या लोक जागृतीतून शिक्षणसंस्था उभ्या राहिल्या. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामुळे जी समाजजागृती झाली, महाराष्ट्र मिळाल्यावर मराठी जनतेने जो लढा दिला, हा लढा ज्या नेत्यांनी व कार्यकर्त्यानी पाहिला. अनुभवला ते खरोखरच भाग्यवान, स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे या लढ्यात सहभागी होणारे पुण्यवान आणि जे हुतात्मे झाले त्यांचे बद्दल ऋणनिर्देश केला पाहिजे. हे खरे मराठी अस्मितेचे प्रतिक. यांनाच महामानव म्हणावयास हवे. अशा लोकजागृतीच्या कार्यातून समाजवादी चळवळ पुढे आली आणि कार्यकर्ते निरनिराळ्या क्षेत्रात काम करू लागले. कोणी सहकाराकडे वळले तर कोणी खादी, ग्रामद्योगाकडे वळले. काहींनी राष्ट्रभाषा प्रचार कार्यास वाहून घेतले. तर काही शिक्षण क्षेत्रात उतरले, काहींनी आदिवासी क्षेत्राला वाहून घेतले. या परिस्थितीचा सम्यक विचार करून समाजवादी कार्यकर्ते श्री. माधवराव लिमये, श्री रावसाहेब ओक, कुसुमताई पटवर्धन, श्री. बा. य. परीट, वैद्य दातार यांचे सहकार्याने कापड बाजारातील ''लोकसत्ता'' हॉलमध्ये दिनांक २८ ऑगस्ट १९६० रोजी एक सभा बोलावून श्रीमती कुसुमताई पटवर्धन यांचे सल्ल्याने महाराष्ट्र समाजसेवा संघ संस्थेचे नाव देऊन संस्था स्थापन झाल्याचे जाहिर करण्यात आले. संस्थेची ध्येयधोरणे निश्चित करून श्री. रावसाहेब ओक (श्री. न. ग. ओक) यांची संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आणि चिटणीस म्हणून माझे नावाचा विचार कार्यकर्त्यांनी केला. तातडीने घटना तयार करुन श्री. माधवराव लिमये यांना दाखवून श्री. रावसाहेब ओक यांचेसह कार्यकारिणीच्या सह्या घेऊन प्रस्ताव पुणे येथील कार्यालयात दाखल करण्यात आला. याकामी श्री. शिरुभाऊ लिमये यांचे सहकार्य मिळाले. त्यामुळे तातडीने दि. २३ सप्टेंबर १९६० रोजी सोसायटी नोंदणी ॲक्ट १८६० मुंबई/१०३/एनएसके/असे

सर्टिफिकेट मिळाले. त्यानंतर संस्थेचे कार्य पाहून सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम नोंदणी क्रमांक ११७ नाशिक असे सर्टिफिकेटसही श्री. विठ्ठलराव पटवर्धन यांनी योग्य ती कागदपत्रे सादर करुन मिळविले. श्री. पटवर्धन, श्री. लिमये, श्री. ओक परिवाराचे, पाठींब्यामुळे संस्था योग्य पध्दतीने मार्गी लागली आहे. म.स.से. संघ निर्मितीचे श्री. रावसाहेब ओक (मितभाषी) प्रभावी कार्यकर्ते होते. त्यांचे प्रभावामुळे शंकराचार्य कुर्तकोटी यांनी विद्यार्थी वसतिगृहासाठी उदार मनाने गंगापूर येथील बिनाभाड्याची भली मोठी जागा त्यांच्या मठातील इमारत सह म.स.से. संघ या संस्थेच्या ताब्यात दिली. संस्थेने त्यावेळी तातडीने १९६१-६२ मध्ये विद्यार्थी वसतिगृह सुरु केले. या वसतिगृहाचे व्यवस्थापन श्री. नागनाथ केसकर आणि वसुंधराताई केसकर हे पाहू लागले. ते राष्ट्रसेवा दलाचे बिन्नीचे कार्यकर्ते होते. तथापि गंगापुर येथून नाशिक येथे सायकलवर डबलसीट प्रवास करीत असताना दोघांना एका मालट्रकने ठोकर दिल्याने व्यवस्थापन अडचणीत आले आणि पुढे वसतिगृह बंद करावे लागले. श्री. मामा अनगळ यांनी संस्था सावरण्याचा प्रयत्न केला. तथापि, आमचे बंद पडल्यामुळे कॉंग्रेसचे एक बडे पुढारी यांनी मला चांदवडकर गल्लीतील खादी भांडारातच सटकावले की, ''ना. सी. पाटील, तुम्ही समाजवादी पुढाऱ्याचे नादी लागला आणि समांतर संस्था निर्माण केली.'' तथापि ती संस्था एकाच वर्षात लयाला गेली. जन्मत: मेली तुम्ही समाजवाद्यांच्या नादी लागून बिघडला. समाजवादी चळवळीत यशस्वी होतील, तथापि त्यांना गांधीवादी रचनात्मक काम जमणारे नाही. त्यांनी फक्त चर्चा कराव्यात आणि मोर्चे काढावेत. सदर शब्द मला खूप बोचून गेले. सदर व्यथा मी श्री. विठ्ठलराव पटवर्धन, श्री. रावसाहेब ओक, माधवराव लिमये यांना सांगितली. श्री. तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या उपस्थितीत श्री. माधवराव लिमये यांचे घरी आमची चर्चा झाली. यावेळी गंगापूर येथे स्वामी विवेकानंद विद्यालयात मी कार्यरत होतो. शालेय सुट्टीच्या वेळात पूर्वीचे कागदपत्र जमा केले. ५/६ वर्षाचे सर्व दप्तर ऑडीट करुन घेण्याचा मला सल्ला देण्यात आला. ऑडीटर श्री. एस. एन. कुलकर्णी यांनी योग्य ती साथ दिली आणि १९६७/६८ यावर्षी शरणपूर रोडवर माध्यमिक विद्यालय काढण्याचा प्रस्ताव दिला. तथापि, जि. प. सत्ता कॉंग्रसची असल्याने आमची डाळ शिजली नाही. आमचा प्रस्ताव फेटाळला गेला. तथापि आम्ही प्रयत्न सोडला नाही.

### भारतीय क्रांती दलाचा उदय

१९६८-६९ नाशिक जिल्हा परिषदेमध्ये उलटापालट झाली आणि लवकरच कॉंग्रेसची सत्ता कोलमडली. भारतीय क्रांती दल या पक्षाचे हातात सत्ता आली आणि या पक्षात माझा एक एम. ए. झालेला माजी विद्यार्थी श्री. अर्जुन तुळशीराम पवार जिल्हा परिषदेवर निवडून आला आणि तो शिक्षण समितीचा सभापती झाला. याच आमचे माजी विद्यार्थ्याने (श्री. ए. टी. पवार) १९६८-६९ मध्ये सादर केलेल्या आमच्या प्रस्तावास मंजुरी मिळवून

दिली आणि ३० मार्च १९६९ रोजीच नाशिक चे शरणपूर भागात माध्यमिक विद्यालय सुरु करण्याची आम्हास परवानगी देण्यात येत आहे, अशी ऑर्डर मिळाली. या माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी करिता विविध वसतिगृहाचे विद्यार्थी मिळवून देण्यास डांगसेवा मंडळाचे अध्यक्ष आमचे मार्गदर्शक गुरु श्री. दादासाहेब बिडकर यांनी मन:पूर्वक साथ केली. कै. कुसुमताई पटवर्धन, कै. शांताबाई लिमये यांनी घरोघर जाऊन १ ली ते ४ थी पर्यंतचे विद्यार्थी जमविले. साने गुरुजींचे स्मृतीदिनी म्हणजेच दि. ११ जून रोजी रचना विद्यालयाची घंटा प्रसिध्द शिक्षण तज्ञ श्री. गं. वि. अकोलकर यांचे हस्ते वाजविली आणि विद्यालय सुरु करण्यात आले. पहिल्या शालेय समितीचे श्री. गं. वि. अकोलकर चेअरमन होते. त्यामुळे पुढील शाळा उभी करण्याचे कार्य सोपे झाले. डायोसन ट्रस्टनेही जागेसाठी मन:पुर्वक साथ केली. एकदा रचना विद्यालय सुरु झाले. आयुष्यातील आणि आनंदाचा दिवस माझ्या ह्दयात कोरला गेला. ११ जून १९६९ हा दिवस म्हणजे जीवनात सोने सापडल्या इतका मला आनंद झाला. कुसुमताई पटवर्धन, शांताताई लिमये यांनी अन्य शाळेतील नोकऱ्या सोडल्या. त्यांनी आपले संस्थेच्या कार्यास वाहून घ्यावे, असा सल्ला श्री विठ्ठलराव पटवर्धन यांना पत्र लिहून खास मी कळविला. थोडी खडबळ माजली; तथापि माझे विचार त्यांनी मे १९६९ मध्ये मान्य केले. कुसुमताई पटवर्धन आणि शांताताई लिमये यांनी स्वत:ची अनुदानित शाळेतील नोकरी सोडून सुरुवातीस विनाअनुदानित असलेल्या या विद्यालयाचे कार्यास वाहून घेतले. जीवनाचे शेवट पावेतो धडपड केली. रचना या नावाने पहिली पणती पेटविलेल्या मुळे याच नावात सुधारणा करुन श्री सुधाकर साळी-कुसुमताई पटवर्धन यांनी नवरचना विद्यालयाची दुसरी पणती पेटविली. आता संस्था स्थापनेस ५० वर्षे झालेली आहेत. रचना ट्रस्ट म्हणून संस्थेने समांतर ट्रस्टही निर्माण केला आहे. महाराष्ट्रातील अत्यंत नामांकित शाळा म्हणून माईलेले मूकबधीर श्रवण विकास विद्यालय प्रसिध्द आहे. डॉ. द. ना. लेले परिवाराचे फार मोठे योगदान या कार्यास मिळालेले आहे त्याचे परिवाराचे धडपडीतून आज जिल्ह्यात नामांकित शाळा म्हणून प्रसिध्द झालेली आहे. कार्यकर्त्यांनी सदर शाळा जरुर पहावी, अशी इमारतीची रचना आहे. संस्थेतर्फे एक विशेषं प्रशिक्षण विद्यालय सुध्दा चालविते आहे. रचना नवरचना विद्यालये, बालवाड्या, आश्रमशाळा, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि बालवाडी प्रशिक्षण केंद्रही चालू आहे. गुणवत्तेनुसार शिक्षकांची निवड होत असल्यामुळे शैक्षणिक दर्जा अत्यंत चांगला उंचावला आहे. संस्थेचे २०० सभासद आहेत. कार्यकारिणीत मुख्याध्यापक व शिक्षकांना स्थान आहे. संस्थेच्या प्रवाहात नविन आमदारांना स्थान आहे. सध्या दुसरी पिढी संस्था चालवित आहे माजी विद्यार्थ्यांचा संस्थेच्या कार्यात सहभाग आहे. अध्यक्ष श्री. चंद्रकांत धामणे, सचिव श्री. सुधाकर साळी, उपाध्यक्ष श्री. डोंगरे, कोषाध्यक्ष, श्री. निरंजन ओक, सहसचिव श्री. अहिरे यांनी आपले सहकार्याची साथ घेवून सदर रथ कुशलतेने अत्यंत चांगल्या

प्रकारेच चालविला आहे या संस्थेचा आद्य संस्थापक (प्रवर्तक) म्हणून मला फार समाधान आहे. मी मुंबई राज्याची पहिली ''एकलव्य आश्रम शाळा'' उंबरठाण ता. सुरगणारे येथे डांगसेवा मंडळातर्फे ऑक्टोबर १९५४ मध्ये सुरु केली आहे. या शाळेचा सुवर्ण महोत्सव डिसेंबर २००४ मध्ये साजरा झाला. त्यावेळी सर्व पदाधिकारी यांचे बरोबर माजी विद्यार्थी आमदार श्री. जे. पी. गावीत, सभापती, श्री. चौधरी, विस्तार अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, आदिवासी विकास अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी माजी विद्यार्थी वी. डी. ओ. देखील उपस्थित होते असे ऐकण्यात आले. त्यामुळे मनाला अत्यंत समाधान वाटले. आश्रमाच्या आंबे लागवड योजनेमुळे सुरगाणा परिसर आंबेमय झाला आहे, असा रेंज फॉरेस्ट अधिकारी यांचा अभिप्राय आहे. शुद्ध भावनेने केलेले कार्य महाराष्ट्र समाजसेवा संघाची २८ ऑगस्ट १९६० रोजी शुद्ध भावनेने बीजाची पेरणी केली ते अंकुरले रोप वाढले. त्याचा वेल गगनावर पोहोचला आहे. आता २०१० मध्ये होणारा सुवर्ण महोत्सव पहात आहे. जीवनाचे सार्थक झाले असे समजतो. सदर कार्य करता मी या शब्दाचे रामकुडांत विसर्जन करुन सदर कार्य आम्ही केले आहे. संस्थेने केले आहे. या कार्यात अध्यक्षापासून शिक्षक, पालक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वांचा सहभाग आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे जी लोक जागृती झाली लोक जागृतीतून समाजवादी विचारांचा ज्या संस्था जिल्हात निर्माण झाल्यात यांनी परस्पर समन्वय साधुन भावीपिढी निर्मितीसाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे, असे मला वाटते. या प्रयत्नात माजी विद्यार्थी संस्थेचा कणा असतो. संस्थेचा उर्जिता अवस्थेत माजी विद्यार्थीच साथ करतात असा काही नामंकित संस्थाचा इतिहास तपासला म्हणजे लक्षात येते. महाराष्ट्र समाजसेवा संघ उभा राहिला त्यास अनेकांचे हात लागले आहे. पाचामुखी परमेश्वर या प्रयत्नामुळे हे घडले. १६ शाखा परिसरात कार्यरत आहे. संस्थेची स्थापना केली हे श्रेष्ठ कार्य समाजवादी विचारवंत कार्यकर्त्यानी माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांकडून करून घेतले यात मला समाधान आहे.

● ● ●


**निवेदन**

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

१. प्रकाशन स्थळ : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

२. प्रकाशन काळ : त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक, संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

४. स्वामीत्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

६ ऑक्टोबर २०११ रा. के. मुटाटकर

प्रकाशक

# कुरमार या भटक्या जमातीचे जीवन

**श्री. प्रभाकर आर. लोंढे**

कुरमार ही जमात चंद्रपूर जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने आढळून येत असून शेळ्यामेंढ्यांचे पालन व त्यावर आधारीत जोडव्यवसाय हे या जमातीचे पारंपरिक उदरनिर्वाहाचे साधन आहे. या जिल्ह्यातील मूल, सावली, नागभिड, सिंदेवाही, गोंडपिंपरी, पोम्भुर्णा या तालुक्यांमध्ये प्रामुख्याने व बहुसंख्येने असलेली ही जमात इतर तालुक्यांमध्ये विरळ असल्याचे आढळून येते. मुळात भटक्या स्वरुपाचे जीवन जगणारी ही जमात अलिकडील काळात वस्ती करुन राहू लागली, तरी त्यांनी आपला पारंपरिक व्यवसाय न सोडल्याने शेळ्यामेंढ्यांच्या चारा-पाण्यासाठी हे लोक आपला फाटका संसार घेवून आजही रानोमाळ भटकताना दिसतात.

मुळात महाराष्ट्राबाहेरची असलेली ही जमात आज महाराष्ट्रात वस्ती करुन राहू लागली आहे. व्यावसायिक साधर्म्यामुळे या जमातीला धनगर जमातीची पोटजमात म्हणून शासन दरबारी मान्यता मिळाली आहे. असे असले तरी हे लोक स्वत:चा उल्लेख 'कुरमार' असाच करतात. त्यांना मराठी भाषा येत असली तरी आपसातील व्यवहार ते आपल्या 'कुरमारी' बोलीतूनच करतात. त्यांच्या बोलीभाषेचा विचार केला असता ती 'कन्नड' भाषेशी एकरुप असून त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यामूळे ते मुळचे कर्नाटक प्रांतातील असल्याचे कुरमार लोक सांगतात. त्यांची जीवनपध्दती वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांच्या बोलीभाषेतील लोकगीते, लोककथा व लोकसाहित्य हे त्यांच्या जीवनाचा एक भाग बनला आहे.

महाराष्ट्रात शेळीमेंढीपालन करणाऱ्या कुरमारांप्रमाणे कर्नाटकामध्ये शेळीमेंढीपालन करणाऱ्या टोळ्यांना 'कुरुबा' नावाने संबोधले जाते. शिवाय मेंढीला 'कुरी' शब्द वापरला जातो. यावरुन कुरीचे पालन करणारा 'कुरुबा' शब्द तयार झाला असावा. त्यांच्या दैनंदिन जीवनातील स्थलांतरामध्ये त्यांची एक टोळी महाराष्ट्रात आली आणि कालांतराने कुरुबाचा अपभ्रंश होवून 'कुरमार' शब्द प्रचलित झाला. महाराष्ट्रातील कुरमार कर्नाटकमधील कुरुबा आणि तामिळनाडूतील कुरुम्बा हे शेळीमेंढीपालन करणारे एकच समूह असून एवढे मात्र निश्चित की, त्यांचा प्रदेशपरत्वे विविध नावांनी उल्लेख सुद्धा होऊ लागला आहे. या सर्वांचे मूळ वस्तिस्थान दक्षिण भारत आहे.

### कुरमारांच्या देवीदेवता

कुरमार लोक धार्मिक प्रवृत्तीचे असून त्यांच्या धार्मिक जीनवात देवीदेवतांना देवीदेवतांना महत्वाचे स्थान आहे. हे लोक विरोबा, खंडोबा, मल्लाया, वाघोबा, यल्लमा (रेणुका देवी), पोच्चका (मातामाय), आकम्मा, दगडूपोच्चका, मेसक्का या देवी देवतांची पूजा करतात. यामध्ये बिरोबा हा त्यांच्यासाठी अतिमहत्त्वाचा देव मानला जात असून त्याचा उल्लेख

हे लोक बडादेव म्हणून सुध्दा करतात. बिरोबाची विशेष पूजा 'आखाडी' (आषाढ पोर्णिमा) व 'दसरा' या सणाला विशेषत्वाने करतात. शिवाय विवाह प्रसंगी ते सर्वच देवांची पूजा करतात. तसेच दर पाच ते सात वर्षांनी मोठादेव (बिरया) ची 'महापूजा' केली जाते. याला 'आब्बा' उत्सव असे म्हणतात. हा त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा प्रसंग असतो. यामध्ये सर्वच जमातबांधव सहभागी होतात.

### लोककथा व लोकगीते

प्रत्येक जमातीमध्ये प्रचलित लोककथा व लोकगीतावरुन त्या जमातीची संस्कृती व जीवनपध्दती लक्षात येते. या जमातीमध्ये काही लोककथा, लोकगीते व आख्यायिका प्रचलित आहे. त्यामधून देवी-देवतांचे महत्त्व, त्यांचा कुरमारांच्या दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध निश्‍चित करण्यात आला आहे. मुळातच उत्सवप्रिय असलेल्या कुरमार जमातीमध्ये उत्सवप्रसंगी तसेच दैनंदिन व्यवहारात काही गीतांची लोकप्रियता दिसून येते. त्यापैकी नमुना म्हणून पुढील गीतांचा उल्लेख करता येईल.

*गुंभळी फुटवा, अप्पने मल्ली पुव्वा आपने*
*आडगील गुलाल, पाडगील कुलाल*
*कुन्नम गोडगुल*
*मोत्याषिल्टनू मेडल्लू तितम्या कायप्पने बंगारी*
*तितू त्याने कायप्पने*

या कुरमारी गीताचा थोडक्यात अर्थ 'आम्ही सर्व कुरमार बांधव फुलांपासून गौर तयार करतो' असा होतो. हे गीत विशेषत्वाने 'बदकम्मा' उत्सवप्रसंगी गायिले जाते. या शिवाय मराठी भाषेच्या प्रभावामुळे यांच्यामध्ये काही मराठी गीते सुध्दा प्रचलित असल्याचे आढळून आले आहे. या मराठी गीतांचे सुद्धा गायन हे लोक करतात. यावरुन अलिकडील काळात त्यांच्यावर मराठी भाषेचा प्रभाव वाढत असल्याचे आपल्या लक्षात येते.

### परंपरागत समाजसंघटन आणि राजकीय नियंत्रण

कुरमार जमातीची स्वत:ची परंपरागत समाज संघटन आणि राजकीय नियंत्रण व्यवस्था होती व ती आजही कार्यरत असल्याचे आपल्या लक्षात येते. त्यांची 'गामदगवणू' ची संकल्पना प्रत्यक्ष लोकशाहीचे उत्तम उदाहरण आहे. याची त्यांना कदाचित कल्पना सुद्धा नसेल तरी ती प्रचलित आहे. या संकल्पनेचा मुळाधार असलेल्या गाम्दगवणूची निवड कुरमार लोक आपल्यातूनच एका व्यक्तीची करतात. मात्र याचे विशेष असे की, यामध्ये ते त्यांच्यामधील श्रीमंत व्यक्तिलाच प्राधान्य देतात. या व्यवस्थेअंतर्गत एका टोळीमध्ये (अलिकडील वस्तीमध्ये) गाम्दगवणू महाजनगवणू लांगशेट्या, लांगमहाजन अशी महत्त्वाची पदे असतात. गाम्दगवणूला गावशेट्या असा सुध्दा नामोल्लेख केल जातो.

या समाज संघटन व राजकीय नियंत्रण व्यस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गाम्दगवणू पदावर असलेल्या व्यक्तीने घेतलेले निर्णय जमातीसाठी अंतिम व सर्वांवर बंधनकारक असतात. या निर्णयाचे पालन न करणाऱ्या जमातबांधवाला शिक्षा करण्याचा अधिकार गाम्दगवणूला असतो.

**व्यावसायिकदृष्ट्या कुरमार**

ही जमात आजही पारंपरिक रीतीने शेळ्यामेंढ्यांचे पालन करीत असून मेंढ्यांच्या लोकरीपासून घोंगडी तयार करणे हा या जमातीचा जोडव्यवसाय आहे. मात्र अलिकडील काळात त्यांनी वस्ती करुन राहण्यास सुरुवात केल्यामुळे व त्यांच्या पारंपारिक व्यवसायासंबंधी अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे त्यांच्यातील नविन पिढ्या पारंपरिक व्यवसायाविषयी निरुत्सुक असल्याचे आढळून आले आहे. जमातीमध्ये थोड्याफार प्रमाणात का होईना शिक्षण घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्यामुळे लोकांनी इतर व्यवसायाला उदरनिर्वाहाचे साधन म्हणून स्वीकारण्यास सुरवात केली आहे. एवढे जरी असले तरी आर्थिकदृष्ट्या फार मागास अवस्थेत असलेली ही जमात प्रचलित अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे असे म्हणावेसे वाटते.

• • •

(पृष्ठ क्र. ३९ वरुन)

पाड्यातील लोकांचे हीत लक्षात घेता आवश्यकता असल्यास विशेष बाब म्हणून वन हक्क समिती गठीत करता येईल.

**प्र. २५. वन जमिनीवर हक्क मिळविण्याकरिता कोणकोणत्या तारखा महत्त्वाच्या आहेत ?**

१. वन जमिनीवर हक्क मिळविण्याकरिता सदर जमिनीवर कब्जाच्या अनुषंगाने दिनांक १३/१२/२००५ च्या अगोदर तसेच दिनांक ३१/१२/२००७ रोजी सदर वन जमीन मागणीदाराच्या कब्जेत असणे आवश्यक आहे.

**प्र. २६. ग्राम सभेने गावाच्या सामूहिक वन संपत्तीचे निश्चिती करणे आवश्यक आहे काय ?**

१. होय. ग्राम सभेने गावांचा सामुहिक वन संपत्तीचे निश्चिती करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण काही ठिकाणी आजु बाजुच्या गावांचा सामुहीक वन संपत्तीचे क्षेत्रातही त्याची व्याप्ति होऊ शकते. सदर सामुहीक वन संपत्तीच्या परस्पर व्याप्ती बद्दल ग्राम सभेने आजु बाजुच्या गावातील ग्राम सभेने कलविणे व त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणी जर मोठ्या प्रमाणात परस्पर व्याप्ती झाली तर त्या बाबत उपविभागीय समिती यांना सदर बाबत कळविण्यात यावे.

**प्र. २७. ग्राम सभेच्या निर्णयामुळे एखादी बाधित झालेली व्यक्ती सरळ जिल्हा स्तरीय समितीकडे अपील करु शकते काय ?**

१. नाही. त्यांनी उपविभाग स्तरीय समितीकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे.

• • •

# {H$ZdQ> VmbwŠ`mVrb Jm|S> Am{XdmgtMr gm_m{OH$–Am{W©H$ nmíd©^y_r : EH$ Aä`mg

**प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम**
**श्री. धनाजी दत्तात्रय पाटील**

**प्रस्तावना**

गोंड ही भारतातील एक आदिवासी जमात आहे. ओरिसा, बिहार, छत्तीसगड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या राज्यांत त्यांचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रात ही जमात विदर्भ आणि मराठवाड्यात राहते.

गोंड जमात ही द्रविड परिवारातील समजली जाते. गोंड या शब्दाची उत्पत्ती काहीशी संदिग्ध आहे. कारण हिंदू आणि मुस्लीम या धर्माच्या लोकांनी या गोंड जमातीस 'कोईतूर' असे नाव दिले. तर दुसरीकडे गोंड या शब्दाचा उच्चार तेलगू लोक 'खोंड' असा करतात. त्यामुळे या जमातीस गोंड हे नाव तेलगू लोकांनी दिले असावे असा सर्वसाधारण निष्कर्ष निघतो.

**गोंड जमातीची लोकसंख्या**

१९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात गोंड जमातीची लोकसंख्या सर्वाधिक होती. सन २००१ च्या जणगणनेनुसार राज्यात गोंड जमातीची लोकसंख्या ११,६२,७३५ इतकी आहे. त्यामध्ये यवतमाळ १,४१,४६२, अमरावती ७१,३८६, अकोले १०,२७२, वर्धा ९५३५८, नांदेड २३,३२४, भंडारा १,०९,७३६ व गडचिरोली ४,३८,१८५ आढळून आली.

शेती हा गोंड जमातीचा मुख्य व्यवसाय आहे. त्यांच्यापैकीच बरेच जण शेतमजूर म्हणून काम सुद्धा करतात. शेती व्यवसाय पूरक म्हणून लाकूड तोडणे, मोहे, लाख डिंक, वनऔषधी–वनस्पती, फुले, मुळी व सरपण गोळा करुन विक्री करणे अशा प्रकारचे जोड व्यवसाय ते करतात.

त्यांच्याकडे असलेल्या जमीनीचे आकारमान किफायतशीर नाही. शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञान, सुधारित बि–बियाणे व रासायनिक खते यांचा अवलंब त्यांनी केलेला नाही. प्रस्तुत अध्ययनात किनवट तालुक्यातील गोंड आदिवासींची सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमीचे एक सखोल अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन समस्या**

गोंड जमातीच्या जीवनमानाचे अनेक अभ्यास आजवर झाले आहेत, पण किनवट तालुक्यातील गोंड जमातीचा अभ्यास प्रादेशिक संशोधनात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून झालेला नाही. मराठवाड्यातील किनवट तालुका हा मागासलेला भाग समजला जातो. त्यामुळे तेथील गोंड आदिवासी जमातीची सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमी समजून घेणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**अध्ययनाचे उद्दिष्ट**

किनवट तालुक्यातील गोंड आदिवासी जमातीची सामाजिक-आर्थिक पाश्वभूमी अभ्यासणे

**अध्ययनाचे क्षेत्र**

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील गोंड आदिवासी जमातीपुरते मर्यादित आहे.

किनवट तालुक्यात गोंड जमातीची लोकसंख्या अन्य जमातीपेक्षा अधिक प्रमाणात आहे. किनवट तालुका हा आंध्रप्रदेश व विदर्भाच्या सीमेवर व पैनगंगा नदीच्या काठावर वसलेला आहे. किनवट तालुका हा डोंगराळ, दुर्गम, दऱ्याखोऱ्याचा व दाट जंगलाने व्यापलेला भूप्रदेश आहे. या डोंगराळ व दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या गोंड जमातीचे सामाजिक जीवन, त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील अल्प असलेले साक्षरतेचे प्रमाण त्याचबरोबर त्यांचा परंपरागत शेती व्यवसाय आहे. शेती व्यवसायाबरोबरच ते पशुपालन, शेळी पालनाचा जोड व्यवसाय करतात. तसेच मजुरीची कामे व मोह, डिंक, तेंदूपत्ता गोळा करणे अशा स्वरूपाची कामे आजही करतात. म्हणून संशोधकाने संशोधनासाठी किनवट तालुक्याचे क्षेत्र निश्चित केले.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

**नमुना निवड प्रद्धती**

किनवट तालुक्याची अध्ययनासाठी हेतुनिष्ठ नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आला.

किनवट तालुक्यातील गोंड जमातीचे लोक निवास करत असलेल्या १० गावांची निवड केली. या १० गावातील प्रत्येक गावातील १० याप्रमाणे १०० उत्तरदात्यांची कुटुंब प्रमुखाची निवड स्तरीय यादृच्छिक नमुना-निवड तंत्राच्या साहाय्याने करण्यात आली.

**तथ्य संकलनाचे तंत्र**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही माहिती स्रोतातून तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

**अ. प्राथमिक स्रोत**

मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने १०० कुटुंब प्रमुखाकडून माहिती संकलीत करण्यात आली.

**ब. दुय्यम स्रोत**

गोंड जमातीवरील पुस्तके, अहवाल, संशोधन, नियतकालिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट हे तथ्याचे दुय्यम स्रोत आहे.

संशोधकाने प्रत्यक्ष कुटुंब प्रमुखांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून तसेच कुटुंबातील सदस्य यांच्या मुलाखती घेऊन जानेवारी २००७ ते जून २००७ या कालावधीत तथ्य संकलित केलेली आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उत्तरदात्यांची व्यक्तीगत, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी वय, लिंग, वैवाहिक दर्जा, शिक्षण, कुटुंबाचा प्रकार कुटुंबातील एकूण सदस्य, व्यवसाय, जमिनीची मालकी, उत्तरदात्या व्यतिरिक्त अन्य काम, रोजगार करणारे सदस्य व कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न इत्यादी परिवर्त्यासंबंधी माहितीचे वर्गीकरण केले आहे.

### वय

उत्तरादात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १.१ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.१**

| उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वय प्रवर्ग | संख्या | टक्केवारी |
| १. | २१ ते ३० वर्ष | १७ | १७ |
| २. | ३१ ते ४० वर्ष | २९ | २९ |
| ३. | ४१ ते ५० वर्ष | २८ | २८ |
| ४. | ५१ ते ६० वर्ष | १३ | १३ |
| ५. | ६१ ते ७० वर्ष | ०८ | ०८ |
| ६. | ७१ ते पुढे | ०५ | ०५ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.१ मधील माहितीवरून असे दिसून येते की, वय प्रवर्ग ३१ ते ४० वर्षे या वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण २९% हे अधिक आहे. त्याखालोखाल ४१ ते ५० वर्षे, २१ ते ३० वर्षे, ५१ ते ६० वर्षे, ६१ ते ७० वर्ष व ७१ च्या पुढे या वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे २८%, १७%, १३%, ०८% व ०५% इतके आहे.

### वैवाहिक दर्जा

नमुन्यातील सर्व १०० उत्तरदाते विवाहित होते.

### शिक्षण

उत्तरदात्यांचे शिक्षणानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १.२ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.२**

**उत्तरदात्यांचे शिक्षणानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | शिक्षण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | निरीक्षर | ११ | ११ |
| २. | प्राथमिक | ६३ | ६३ |
| ३. | माध्यमिक | ०९ | ०९ |
| ४. | उच्च माध्यमिक | १४ | १४ |
| ५. | पदवी | ०२ | ०२ |
| ६. | पदव्युत्तर | ०१ | ०१ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.२ मधील माहितीवरून असे दिसून येते की, नमुन्यातील एकूण १०० उत्तरदात्यांमध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण ६३% हे सापेक्षता अधिक होते.

त्याखालोखाल उच्च माध्यमिक, माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले उत्तरदाते अनुक्रमे १४%, ०९%, ०२% व ०१% इतके होते. तर निरीक्षर उत्तरदात्यांचे प्रमाण ११% इतके होते.

### कुटुंबाचा प्रकार

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १.३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.३**

| उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | शिक्षण | संख्या | टक्केवारी |
| १. | संयुक्त कुटुंब | ५४५४ | |
| २. | विभक्त कुटुंब | ४६४६ | |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.३ मधील माहितीवरून असे दिसून येते की, निवडलेल्या नमुन्यात संयुक्त कुटुंबाची पार्श्वभूमी असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५४% हे सापेक्षत: अधिक होते. उर्वरित ४६% उत्तरदाते विभक्त कुटुंबाची पार्श्वभूमी लाभलेली होते.

**कुटुंबाचा आकार**

विश्लेषणाच्या सोयीसाठी १ ते ४ सदस्य असणाऱ्या कुटुंबांना 'लहान कुटुंब' मानण्यात आले, ५ ते ७ सदस्य असणाऱ्या कुटुंबाना 'मध्यम कुटुंब' मानण्यात आले, तर ८ पेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या कुटबांना 'मोठे कुटुंब' मानण्यात आले. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्यांच्या कुटुंबाच्या आकारानुसार केलेले वर्गी-करण सारणी क्रमांक १.४ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.४**

| उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या आकारानुसार केलेले वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | एकूण सदस्य | संख्या | टक्केवारी |
| १. | लहान कुटुंब १ ते ४ सदस्य | ३१ | ३१ |
| २. | मध्यम कुटुंब ५ ते ७ सदस्य | ५५ | ५५ |
| ३. | मोठे कुटुंब ८ पेक्षा अधिक सदस्य | १४ | १४ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.४ मधील माहितीवरून असे दिसून येते की, निवडलेल्या नमुन्यात, मध्यम कुटुंबाची पार्श्वभूमी असणारे उत्तरदाते सर्वाधिक ५५% होते. तर लहान कुटुंबाची पार्श्वभूमी लाभलेले उत्तरदाते ३१% होते. उर्वरित १४% उत्तरदाते मोठे आकाराच्या कुटुंबाची पार्श्वभूमी लाभलेले होते.

**व्यवसाय**

उत्तरदात्यांच्या व्यवसायाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १.५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.५**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा व्यवसाय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | नोकरी | ०१ | ०१ |
| २. | शेती | ७५ | ७५ |
| ३. | स्वयंरोजगार | २० | २० |
| ४. | शेतमजूर | ०४ | ०४ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.५ मधील माहितीवरून असे दिसून येते की, शेती हा प्रमुख व्यवसाय असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक ७५% होते. त्याखालोखाल स्वयंरोजगार, शेतमजुरी व पगारी नोकरी हा व्यवसाय असणारे उत्तरदाते अनुक्रमे २०%, ४०% व ०१% इतके होते.

### शेत जमिनीची मालकी

उत्तरदात्यांचे जमीनीला मालकीनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १.६ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १.६**

**उत्तरदात्यांचे शेतजमिनीचा मालकीनुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | शेत जमीनीची मालकी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २ एकर | ५२ | ५२ |
| २. | ३ ते ४ एकर | ३१ | ३१ |
| ३. | ५ ते ७ एकर | १६ | १६ |
| ४. | ८ एकर पेक्षा अधिक | ०१ | ०१ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.६ मधील माहितीवरून असे दिसून येते की १ ते २ एकर जमिनीची मालकी असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५२% सापेक्षता अधिक होते.

त्याखालोखाल ३ ते ४ एकर, ५ ते ७ एकर व ८ एकर पेक्षा अधिक जमिनीची मालकी असणारे उत्तरदाते अनुक्रमे ३१%, १६% व १% असल्याचे दिसून येते.

### कुटुंबातील काम रोजगार करणारे सदस्य

स्व:त: कुटुंबप्रमुखा व्यतिरिक्त कुटुंबातील अन्य काम रोजगार करणाऱ्या सभासदांचे वर्गीकरण सारणी क्रमांक १.७ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

### सारणी क्रमांक १.७

### काम करणाऱ्या सदस्यानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | काम रोजगार करणारे सदस्य | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ सदस्य | २८ | २८ |
| २. | २ सदस्य | ४७ | ४७ |
| ३. | ३ सदस्य | १६ | १६ |
| ४. | ४ सदस्य | ०७ | ०७ |
| ५. | ५ सदस्या पेक्षा अधिक | ०२ | ०२ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक १.७ वरून असे दिसून येते की, कुटुंबप्रमुखा व्यतिरिक्त ज्यांच्या कुटुंबातील अन्य काम रोजगार करणारामध्ये २ सदस्य असणाऱ्याचे प्रमाण ४७% सर्वाधिक आहे.

त्याखालोखाल १ सदस्य, ३ सदस्य, ४ सदस्य व ५ सदस्य सदस्यापेक्षा अधिक काम रोजगार करणारे सदस्य असणारे उत्तरदाते अनुक्रमे २८%, १६%, ०७% व ०२% असल्याचे दिसून येते.

### उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे एकूण सरासरी मासिक उत्पन्न

उत्तदात्यांना ''सर्व मार्गांनी मिळून येणारे आपल्या कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न किती ?'' असा प्रश्न विचारला असता, या प्रश्नाला उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांचे वर्गीकरण सारणी क्रमांक १.८ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

### सारणी क्रमांक १.८

### उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे एकूण सरासरी मासिक उत्पन्न

| अ.क्र. | मासिक उत्पन्न | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ०१ ते १,००० रूपये | २५ | २५ |
| २. | १,००१ ते ५,००० रूपये | ५९ | ५९ |
| ३. | ५,००१ ते १०,००० रूपये | १३ | १३ |
| ४. | १०,००१ पेक्षा अधिक | ०३ | ०३ |
| | एकूण | १०० | १०० |

सारणी क्रमांक १.९ मधील माहितीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये १,००१ ते ५,००० रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५९% सापेक्षता अधिक होते.

त्याखालोखाल ०१ ते १,००० रुपये, ५,००१ ते १०,००० रूपये व १०,००१ पेक्षा अधिक इतके सरासरी मासिक उत्पन्न असणारे उत्तरदाते अनुक्रमे २५%, १३% असल्याचे दिसून येते.

### अध्ययनाची ठळक निष्कर्ष

१. नमुन्यातील बहुसंख्य २९% उत्तरदाते ३१ ते ४० वर्षे वयोगटातील होते.

२. नमुन्यातील सर्वच उत्तरदाते विवाहित होते.

३. नमुन्यातील बहुसंख्य ६१% उत्तरदाते प्राथमिक शिक्षण घेतलेले हाते.

४. नमुन्यातील बहुसंख्य ५४% उवरदात्यांची कुटुंबे संयुक्त प्रकारची आहेत.

५. बहुसंख्य ५५% उत्तरदाते ५ ते ७ सदस्य असणाऱ्या मध्यम कुटुंबातील होते.

६. बहुसंख्य ७५% उत्तरदात्यांचा मुख्य व्यवसाय शेती होता.

७. नमुन्यातील बहुतांशी ५२ उत्तरदात्यांकडे १ ते २ एकर जमिनीची मालकी होती.

८. नमुन्यासाठी निवडलेल्या १०० उत्तरदात्यांमध्ये ५९% उवरदात्यांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न १,००० रु. ते ५,००० रु. या प्रवर्गात मोडणारे आहे.

९. नमुन्यातील बहुतांशी ४७% उत्तरदात्यां व्यतिरिक्त कुटंबामध्ये अन्य काम रोजगार करणारे २ सदस्य होते.

**समारोप**

किनवट तालुक्यातील गोंड आदिवासी जमातीची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासणे हे प्रस्तुत अभयासाचे प्रमुख उदिष्ट होते. २१ व्या शतकामध्ये जागतिकीकरण आधुनिकीकरणाचा प्रभाव आदिवासी कुटुंबावर सापेक्षेते कमी असल्याचे दिसून आले. आदिवासीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. शेती व शेतीला पुरक जोडव्यवसायामुळे शेतीमध्ये रासायनिक व प्रगत तंत्रज्ञानाच्या अभावामुळे आर्थिक स्थिती फारच कमकुवत यांचा परिणाम त्याच्या आरोग्यावर सुद्धा होतो, असेही संशोधकाच्या प्रकर्षाने जाणवले.

• • •

(पृष्ठ क्र. ४८ वरुन)

आहे. वारली चित्रकारांपैकी प्रसिद्ध चित्रकार म्हणजे ठाणे जिल्ह्यातील शांताराम तुंबडा यांनी काढलेली वारली चित्रकला आजही फ्रान्समधील लिऑन शहरातील टोनी गार्वियर म्युझियमच्या भिंतीवर सौंदर्यपूर्ण दिसत आहे. जीवा सोमा म्हसे, बाळू ताडक्या दुमडा, नथू देवू सुतार, मानकी बापू वायडा असे अनेक वारली चित्रकार राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धीस आलेले आहेत.

**वारली चित्रकलेचे वैशिष्ट्य**

१. वारली लोकांची कुलदेवता ‘महालक्ष्मी’ असल्याने देवीची यात्रा हा विषय अनेक चित्रकारांच्या चित्रातून दिसतो.

२. वारली चित्रसंस्कृतीत भात शेतीला महत्त्व असल्याचे तेथील जलचरप्राणी, स्त्री-पुरूषांची चित्रे शेतात कल्पकतेने दाखविलेली आहेत.

३. एकाच चित्रात अनेक विषयांचे एकत्रीकरण केलेले आहे. त्यावरून वारली चित्रकारांची निरीक्षण शक्ती तीक्ष्ण असल्याचे दिसून येते.

४. वारली चित्रकार आपल्या चित्रात पाळीव प्राण्यांना विसरत नाही.

५. तारप्याच्या सुराप्रमाणे त्यांच्या नृत्यातला वेग आणि लय तितक्याच उत्कटतेने चित्रातही दिसते.

६. सहजसोप्या त्रिकोणी आकारावर आधारित मानवाकृती प्राणी, पक्षी यांची चित्रे काढलेली आहेत.

• • •

# अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८

**प्र.१ या काद्यातील हक्कांसाठी कोण पात्र आहे?**

उत्तर : वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरीक हे हक्कांसाठी पात्र आहेत.

**प्र.२ वननिवासी अनुसूचित जमाती म्हणजे काय?**

उत्तर : वन निवासी अनुसूचित जमाती म्हणजे मुख्यत्वेकरून वनात राहणारे अनुसूचित जमातींचे सदस्य किंवा समाज असा आहे त्यामध्ये अनुसूचित जमातींचे फिरस्ता आदिवासी समाज जे उपजिविकेच्या वास्तविक गरजांसाठी वनांवर किंवा वनजमिनींवर अवलंबून असलेला असा समाज यांचा समावेश होतो.

**प्र.३ इतर पारंपारीक वननिवासी म्हणजे काय?**

उत्तर : इतर पारंपरीक जंगलवासी याचा अर्थ १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढयांपासून (पीढी याचा अर्थ २५ वर्षांचा कालखंड)मुख्यत्वेकरून वनात राहणारा आणि उपजीविकेच्या वास्तविक गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबून असणारा कोणताहि सदस्य किंवा समाज, असा आहे.

**प्र.४ ग्रामसभा म्हणजे काय?**

उत्तर : ग्रामसभा याचा अर्थ गावातील सर्व पौढ सदस्यांची मिळून बनलेली ग्राम सभा आणि पंचायत नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले व अन्य पारंपारीक मान्य ग्राम संस्था आणि हिलांचा पूर्ण व अनिर्बंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समित्या असा आहे.

**प्र.५ ग्रामसभेची कार्येकोणती ?**

उत्तर १ : वन हक्कांचे स्वरूप व व्याप्ती निर्धारित करण्याची प्रक्रिया सुरू करील आणि त्याच्या संबंधित दावे प्राप्त करून त्यांची सुनावणी करील.

उत्तर २ : वनहक्कांच्या मागणीदारांची यादी तयार करील व मागणीदार व त्यांचे दावे यांच्या केंद्र सरकारने आदेशाद्वारे निर्धारीत केलेल्या अशा तपशीलाचा अंतर्भाव असलेली नोंदवही ठेवील.

उत्तर ३ : हितसंबंधी व्यक्ती व संबंधित प्राधिकरण यांना वाजवी संधी दिल्यानंतर वन हक्कांच्या मागण्यांचा निर्णय संमत करील व तो उपविभागस्तरीय समितीकडे अग्रेषित करील.

उत्तर ४ : अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट कलम (२) याच्या खंड (ङ:) अन्वये पुनर्वसाहतींची पॅकेजेस विचारात घेईल व यथोचित निर्णय संमत करील आणि

उत्तर ५ : अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदी अंमलात आणण्याच्या दृष्टीने वन्यजीवन वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी तिच्या सदस्यांमधून समिती घटित करील.

**प्र. ६ : वनहक्क समितीकडून दाव्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया कशी असते ?**

उवर १ : प्रथम वन हक्क समिती मागणीदारास व वन विभागास योग्य सुचना देते त्यानंतर ...

क) वन हक्क समिती जागेला भेट देईल व जागेवरच दाव्याचे स्वरुप, व्याप्ती व पुरावा यांची प्रत्यक्ष पडताळणी करील आणि

ख) वन हक्क समिती मागणीदार व साक्षीदारांनी सादर केलेला सादर केलेला आणखी कोणताही पुरावा किंवा अभिलेख स्वीकारील.

ग) वन हक्क समिती फिरते आदिवासी व भटक्या जमाती, एकतर वैयक्तिक सादस्यांमार्फत, सामुहिकरीत्या किंवा परंपारिक सामुहिक संस्थेद्वारे त्यांचे हक्क निर्धारित करण्याकरीता केलेल्या हक्कामागणीची जेव्हा अशी व्यक्ती, समूह किंवा त्याचे प्रतिनिधी हजर असतील तेव्हा पडताळणी करण्यात आली असल्याची खात्री करील.

घ) वन हक्क समिती आदिम आदिवासी गट किंवा कृषि-पूर्व समूह यांच्या सदस्यांनी त्यांच्या समूहाद्वारे असो किंवा पारंपरिक समूह संस्थेद्वारे असो त्यांच्या वसतिस्थानाचा हक्क निर्धारित करण्याकरिता केलेल्या मागणीहक्कांची पडताळणी असे समूह किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर असतांना करण्यात आली असल्याची खात्री करील.

ड) वन हक्क समिती ओळखता येण्याजोगी सीमा चिन्हे दर्शवून प्रत्येक हक्क मागणीच्या क्षेत्राचा सीमांकन नकाशा तयार करील.

२) वन हक्क समिती त्यानंतर हक्क मागणीवरील तिचे निष्कर्ष नोंदवील आणि ग्राम सभेपुढे ते विचारार्थ सादर करील.

३) जर दुसऱ्या गावाच्या परंपरागत किंवा रुढीगत हद्दींच्या बाबतीत परस्पराविरोधी हक्क मागण्या असतील किंवा जर वन क्षेत्राचा वापर एकापेक्षा अधिक ग्राम सभांकडून केला जात असेल तर संबंधित ग्राम सभांच्या वन हक्क समित्या अशा हक्क मागण्यांच्या उपभोगाच्या स्वरुपावर विचार करण्यासाठी एकत्र बैठक घेतील आणि संबंधित ग्राम सभांना त्यातील निष्कर्ष लेखी सादर करतील.

४) परंतु असे की, जर ग्रामसभेला परस्परविरोधी हक्क मागण्यांबाबत निर्णयाकरिता त्या उप-विभाग स्तरीय समितीकडे निर्देशित करण्यात येतील.

५) ग्रामसभा किंवा वनहक्क समिती यांनी माहिती, अभिलेख या दस्तऐवज मिळण्यासाठी लेखी विनंती केल्यावर संबंधित अधिकारी त्याची अधिप्रमाणित प्रतीक्षा ग्राम सभेकडे किंवा यथास्थिति वन हक्क समितीकडे पाठवील आणि आवश्यक असल्यास अधिकृत अधिकायाद्वारे त्याचा अर्थ सुकर करण्यात येईल.

**प्र. ७ : वनहक्क निश्चित करण्यासाठी कोणते पुरावे द्यावे लागतात ?**

उत्तर १ : वन हक्कांना मान्यता देण्यासाठी व ते विहीत करण्यासाठी खालील पैकी कमीत कमी दोन पुरावे द्यावे लागतील.

क) सार्वजनिक दस्तऐवज, राजपत्रे, जनगणना, सर्वेक्षण व समझोता अहवाल, नकाशे उपग्रहीय नित्रे, कार्य योजना, व्यवस्थापन योजना, सूक्ष्म योजना, वन चौकशी अहवाल, इतर वन अभिलेख, पट्टा किंवा भाडेपट्टा यांपैकी

कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या हक्कांचा अभिलेख यासारखे शासकीय अभिलेख, समित्या किंवा आयोगांचे शासनाने घटित केलेले अहवाल, शासकीय आदेश, अधिसूचना, परिपत्रके ठराव.

ख) मतदार ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका, पासपोर्ट, घरपट्टी पोच पावत्या, अधिवास प्रमाणपत्रे यासारखे शासनाने प्राधिकृत केलेले दस्तऐवज.

ग) घर झोपड्या व जमिनीवर केलेल्या स्थायी सुधारणा, जसे समतलन, बांध बांधणे, रोधी बांध व तत्सम इतर भौतिक गुणविशेष.

घ) न्यायालयीन आदेश व न्याय निर्णय यांचा समावेश असलेले न्यायिकवत व न्यायिक अभिलेख.

ड) कोणत्याही वन हक्कांचा उपभोग दर्शविणाऱ्या आणि रुढिगत कायद्याचे बळ असणाऱ्या रुढींचा व परंपरांचा भरतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेने केलेला संशोधनात्मक अभ्यास व लेखांकन.

च) भूतपूर्व प्रांतिक राज्य किंवा प्रांत किंवा अशा इतर मध्यस्थ संस्थांकडून मिळालेला कोणताही अभिलेख यात नकाशे, हक्कनोंदी, विशेषाधिकार, सूट, अनुग्रह यांचा अंतर्भाव असेल.

छ) प्राचीनत्व सिध्द करणाऱ्या विहिरी, दफनभूमि, पवित्र स्थळे यांसारख्या पारंपारिक रचना.

ज) पूर्वीच्या भूमी अभिलेखात नमूद केलेल्या व्यक्तींच्या पूर्वजांचा माग काढणारी किंवा पूर्वीच्या काळी त्या गावातील कायदेशीर रहिवासी असल्याची ओळख पटविणारी वंशावळ.

झ) मागणीदारा खेरीज अन्य वडीलधाऱ्या माणसाचे लेखनिविष्ट कथन

२) सामूहिक वन हक्कांच्या पुराव्यात इतर गोष्टींबरोबर पुढील बाबींचा अंतर्भाव असेल

क) सामूहिक हक्क जसे, निस्तार-मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असोत.

ख) पारंपारिक चराई मैदाने मुळे व कंद, वैरण, वन्य खाद्यफळे व इतर गौण वनोत्पादने, मच्छिमार क्षेत्रे, सिंचन व्यवस्था, मनुष्य किंवा पशूंच्या वापरासाठी पाण्याचे स्रोत, औषधी वनस्पती गोळा करणाऱ्या वनस्पती व्यवसायींचे भूप्रदेश.

ग) स्थानिक समूहाने बांधलेल्या रचनेचे अवशेष, पवित्र झाडे, देवराई, तळी किंवा नदीक्षेत्रे, दफन किंवा दहनभूमि.

३) ग्राम सभा, उप विभाग स्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती, वन हक्क निर्धारित करताना वन नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतील.

**प्रश्न ८ : वनहक्कधारकाची कर्तव्ये कोणती ?**

क) कोणत्याही वन हक्कधारकाने वन्य जीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण केले पाहिजे.

ख) कोणत्याी वन हक्कधारकाने लगतची पाणलोट क्षेत्रे, जल स्त्रोत व परिस्थितीकदृष्ट्या अन्य संवेदनाक्षम क्षेत्रे पुरेशी संरक्षित आहेत याची सुनिश्चिती केली पाहिजे.

ग) कोणत्याही वन हक्कधारकाने वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांचे निवासस्थान, यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रथांपासून सुरक्षित ठेवले असल्याची सुनिश्चिती केली पाहिजे.

घ) कोणत्याही वन हक्कधारकाने सामाजिक वनांचे स्त्रोत मिळविण्याच्या मार्गाचे विनियमन करणे आणि वन्य प्राणि, वन व जैविक विविधता यांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे यांच्यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती केली पाहिजे.

**प्र. ९ ग्रामसभेच्या निर्णयामुळे बाधित झालेल्या व्यक्तीने कोणती कार्यवाही करावी ?**

१. ग्रामसभेच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने पोटकलम (३) अनव्ये स्थापन करण्यात आलेल्या उपविभाग स्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील आणि उपविभभगस्तरीय समिती अशा विनंती अर्जावर विचार करुन तो निकालात काढील.

२. परंतु असा प्रत्येक विनंती अर्ज ग्रामसभेद्वारे निर्णय संमत झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दाखल केला पाहिजे.

३. व्यथित व्यक्तीला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही विनंती अर्ज तिच्या विरुद्ध निकालात काढला जाणार नाही.

**प्र. १०. उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयामुळे बाधित झालेल्या व्यक्तीने कोणती कार्यवाही करावी ?**

१. उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत जिल्हा स्तरिय समितीकडे विनंती अर्ज दाखल केला पाहिजे. जिल्हा स्तरिय समिती अशा विंनती अर्जावर विचार करुन तो निकालात काढील.

२. परंतु उपविभाग स्तरीय समितीकडे अर्ज दाखल करण्यात आल्या खेरीज आणि तिने त्यावर विचार केला असल्याखेरीज ग्रामसभेच्या निर्णया विरुद्धाचा कोणताही विनंती अर्ज थेट जिल्हा स्तरीय समितीकडे दाखल करण्यात येणार नाही.

३. व्यथित व्यक्तीला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही विनंती अर्ज व्यथित व्यक्तीच्या विरुद्ध निकालात काढला जाणार नाही.

**प्र. ११ वनहक्क समितीची स्थापना कशी करावी**

हक्कनोंदीच्या दाव्यासाठी बोलविलेल्या ग्रामसभांना २/३ गणसंखेची आवश्यकता आहे. ग्रामसेवक ह्या ग्रामसभांचा सचिव असेल. अशा

पहिल्या ग्रामसभेत दहा ते पंधरा जणांची समिती निवडून तसेच या सदस्यांमधून अध्यक्ष व सचिवाची निवड करुन त्यांच्या नावाच्या यादीसह ठराव संमत करावयाचा आहे. हा ठराव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचा आहे. ह्या समितीला वन हक्क समिती म्हणून ओळखले जाईल. या समिती मध्ये किमान १/३ सदस्य अनुसूचित जमातीचे व किमान १/३ महिला सदस्य असावयास हव्या.

**१२. या कायद्यात कोण-कोणते हक्क आहेत ?**

कायद्यात १३ हक्कांची यादि आहे. परंतु मुलत: हक्क खालील प्रमाणे आहेत.

१. धारण केलेल्या किंवा लागवडीखालील जमिनीचा हक्क

२. गौण वनउपजावरील हक्क

३. जमीन वापराचा हक्क गुरे चारणे, मासेमारी इत्यादिचा हक्क

४. घरांचा हक्क

५. निवासस्थानाचा हक्क (फक्त शेतीपूर्व समूह व आदिम आदिवासी गटांकरिता लागू)

६. पुनर्वसनाचा हक्क मागता येतो.

**प्र. १३ गट ग्रामपंचायतीमधील महसूल गावे अतिदुर्गम क्षेत्रात तसेच एकमेकांपासून दूर असतील तर प्रत्येक गावासाठी स्वतंत्र वन हक्क समिती स्थापन करण्यात यावी काय ?**

उत्तर : गट ग्रामपंचायतीमधील प्रत्येक महसूल गावासाठी त्याच गावांच्या लोकांकडून स्वतंत्र वन हक्क समिती स्थापन करण्यात यावी.

**प्र. १४ वन हक्क समितीत सुशिक्षितांना निवडावे**

१. ग्राम सभा यांनी १० वी किंवा १२ वी पास असलेल्या एक किंवा दोन सदस्य वन हक्क समितीत निवडावे.

२. वन हक्क समितीच्या सदस्यांनी गावातील इयत्ता १० वी किंवा १२ वी पास असलेल्या सुशिक्षितांना सदस्य सचिव म्हणून निवडावे.

**प्र. १५ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र नसेल तर काय करावे. ?**

१. कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शाळेच्या दाखल्यावर जातीची नोंद असेल तर ती या कायद्याकरिता ग्राहय धरण्यात यावी.

२. नातेवाईकांच्या शाळेच्या दाखल्यावरील जातीची नोंद ग्राह्य धरण्यात यावी.

३. जातीबद्दल शंका असल्यास वन हक्क समिती संबंधित लाभार्थ्यांना निर्देश देऊन उप विभागीय अधिकारी (प्राधिकृत अधिकारी) यांचेकडून जातीचा दाखला घेऊन अर्जासोबत सादर करण्यास आदेशीत करतील.

**प्र. १६. १९७५ च्या खाजगी वन संपादन अधिनियम अंतर्गत येणाऱ्या वन जमीनीसाठीही सदर कायदा लागू आहे काय ?**

१. होय-शासनाकडे विहीत झालेल्या अशा वन

क्षेत्रातही सदर कायदा लागू करण्यात येणार आहे.

**प्र. १७. दळी व एकसाली प्लॉट ची प्रकरणे सदर कायद्यातील कोणत्या कलमा अंतर्गत राहणार आहे ?**

१. कलम ३ (१) (छ) अंतर्गत सदर प्रकरणे हाताळता येतील.

**प्र. १८. अतिक्रमक हे इतर व्यवसायही करत असतील तरीही त्यांना वन जमीन द्यावी का ?**

१. मागणीदार यांच्या उपजिविकेच्या वास्तविक गरजा त्याच्या ताब्यातील वनावर किंवा वन जमिनीवर अवलंबून असतील तरच तो या कायद्याखाली पात्र मागणीदार असू शकतो. या बाबत नियम २००८ चा कलम क्र. २ (ख) पाहण्यात यावा.

**प्र. १९. वन हक्क समितीचे सदस्य सचिव हे ग्राम सभा सदस्यांमधून निवडावे किंवा ग्राम सेवकच सदस्य सचिव राहतील ?**

१. वन हक्क समितीचे सदस्य सचिव त्याच समितीतील सदस्यांमधून निवडण्याचे काम वन हक्क समितीनेच करावयाचे आहे.

**प्र. २०. कायद्याचे कलम ५ अन्वये वन हक्क धारण करणाऱ्या ग्रामसभा व गावच्या स्तरावरील संस्थांकडून नेमके काय अपेक्षित आहे ?**

१. सदर कलमान्वये उपरोक्त सर्व यांनी वन्यजीव, वने आणि जैवविविधता, नैसर्गिक साधन संपत्ती, सास्कृतिक धरोहर इत्यादिंचे संरक्षण करणे अपेक्षित आहे. तसेच ग्राम सभा यांनी नियमाच्या कलम ४ (ई) प्रमाणे यासाठी समित्या गठन करावयाच्या आहेत.

**प्र. २१. ग्राम सभेच्या सामुदायिक हक्कांबाबतचा दावा कोण तयार करणार आहे ?**

१. वनहक्क समिती

**प्र. २२. ज्या लोकांचे पुनर्वसनाचे काम पुर्ण झालेले आहे त्यांनाही पुर्वीच्या जागेवर वैयक्तीक हक्क देता येणार आहे काय ?**

१. नाही. नियमाप्रमाणे पुनर्वसित लोकांना अगोदरच्या जमीनीवर हक्क देता येत नाही.

**प्र. २३. नियम २००८ च्या कलम १२ मध्ये ''वन विभाग'' म्हणजे कोणते अधिकारी ?**

१. याबद्दल प्रधान मुख्य वन संरक्षक म. रा. यांनी संबंधीत अधिकाऱ्यांचे पदनाम प्रस्तावित करुन शासनाकडून आदेश मागितलेले आहेत. यावर शासन आदेश प्रतिक्षित आहेत.

**प्र. २४. काही क्षेत्रात पाडे अतिदुर्गम क्षेत्रात आहेत व अशा पाड्यातील लोकांचा सहभाग ग्राम सभेमध्ये होणे अत्यंत कठीण असल्याने अशा पाड्यांवर वेगळी वन हक्क समिती बनविता येते काय ?**

१. अधिनियमाच्या कलम २ (छ) तसेच कलम २ (त) यातील व्याख्यांचा आधार घेऊन या

(पृष्ठ क्र. २६ वर पहा)

# शोषखड्डा - सांडपाण्यावरील सोपा उपाय

**ग. शां. पंडित**

शरद, आज फार खुशीत होता. कारण पाच वर्षांनंतर, तो आज आपल्या गावाला चालला होता. एसटीत बसल्याबसल्या त्याला पाच वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला.

तालुक्याच्या शाळेत १० वीची परीक्षा चांगल्या गुणांनी पास होऊन पुढच्या शिक्षणासाठी तो शहरात आला होता. येताना त्याला घर, गाव सोडवत नव्हतं. पण आई-वडिलांची इच्छा होती, 'पोरानी लय शिकावं, गावात नाव काढावं.' शरदनेही आई-वडिलांची इच्छा पुरी केली होती. शेतकी विषयातली पदवी घेऊन तो आज गावाला परत निघाला होता. ''आपलं गाव बरंच बदललं असणार' असं त्याला वाटत होतं. कधी एकदाचा गावाला जातो, असं झालं होतं. विचारांमध्ये असतानाच कधी गाव आलं ते त्याला कळलंच नाही. एसटीची बेल वाजली नि तो भानावर आला.

शरद एसटीतून उतरला, तेव्हा समोर त्याच्या स्वागताला आई पवळाबाई, वडील पिराजी, बहीण मंदा, सरपंच विमलताई, पाटील रामराव आणि गावातली आणखी ४-५ मंडळी हजर होती. त्या गावकऱ्यांना सुद्धा आपल्या गावचं पोरगं बरीच बुकं शिकलं, याचा अभिमान होताच.

सगळ्यांच्या बरोबर चालताना, शरद आपलं गाव डोळे भरुन पाहात चालला होता. पण जसजसा तो गावात शिरु लागला, तसतशी त्याच्या चेहऱ्यावर नाराजी दिसू लागली. कारण घराघरांतले सांडपाणी रस्त्यावरुन वाहताना दिसत होते. गटारे तुंबलेली होती. जागोजाग डबकी साचलेली होती. ते सगळं त्याने पाहिलं; पण तो काहीच न बोलता घरी आला.

दोन दिवस गावात हिंडला; पण सगळीकडे घाण, दलदल पाहून बेचैन झाला. एकदिवस त्याने वडिलांकडे विषय काढला. ''दादा, काय ही गावाची दशा! अहो, मला वाटत होतं, पाच वर्षात गाव बरंच सुधालं असेल. पण इथं तर उलटंच दृश्य दिसतंय!''

''होय पोरा, खरंय तुझं. पण इथलं राजकारण नडतंय बघ. बाई सरपंच झाली म्हणून तिचं कुणीच ऐकाया तयार नाही.'' पिराजीने उत्तर दिले. शरदला या गोष्टीचे नवल वाटले. तो म्हणाला, ''कमाल आहे ! बाई सरपंच झाली म्हणजे ती काय गावाचा विकास करणार नाही का ? विकासाचा ठेका काय पुरुषांनीच घेतलाय का ? उलट या सगळ्या घाणीचा त्रास बायांनाच जास्त होतो. ज्या आपलं घर स्वच्छ ठेवतात, त्यांना आपलं गाव स्वच्छ राहावं, असं वाटणार नाही का?''

शरदचा संताप पाहून पिराजीला काय बोलावं कळेना, तरीही त्याने शरदला समजावण्याचा प्रयत्न केला. ''हे बघ शरद, तू म्हणतोयस ते समदं खरंय. पण गावाला कोण समजावणार ? आता तू शिकून

आलायस. बाहेरचं जग बघितलंस. तवा आता तूच आमा आडाण्यांना समजावून सांग.'' पिराजीच्या बोलण्याने शरद काय ते समजला आणि पुढे काही न बोलता गप्प राहिला.

शरद गावाला परत निघाला होता, तेव्हा त्याच्या मनात गावाकडच्या शेतीत नव-नवीन प्रयोग करायचे होते. पण इथे आल्यावर मात्र त्याने ठरवले की, आधी गाव सुधरायचा नि मग बघू शेतीकडं.

त्याने गावच्या सरपंच विमलताईंची भेट घेतली. गावातल्या समस्या व त्यावर काय करता येईल याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. शरदशी बोलल्यावर विमलताईंना सुद्धा बरं वाटलं. त्या म्हणाल्या, ''शरद, अगदी देवासारखा आलास बघ. माझ्या मनात पण असं काहीतरी केलं पाहिजे, हे बरेच दिवस होतं. पण मला तुझ्यासारखं सांगणारं कुणी भेटलं नाही. पुढच्या आठवड्यात आपल्या ग्रामपंचायतीची ग्रामसभा आहे. तू त्या सभेत आपल्या गावकऱ्यांना तुझ्या काय कल्पना आहेत समदं सांग. गावकरी तुझं नक्की ऐकतील बघ. मग आपण ठरवू काय करायचं ते.'' विमलताईंशी संवाद झाल्यामुळे शरदला खूप समाधान वाटलं. पुढचे सात-आठ दिवस त्याच्या मनातल्या कल्पना त्याच्या डोळ्यासमोर दिसत होत्या.

ग्रामसभेचा दिवस उजाडला. पिंपळाच्या पाराजवळ लोकं जमू लागली. दवंडी देताना शिपायाने ग्रामसभेला बायांनी पण यावं, असं सांगितलं असल्यामुळे सभेला बायांची सुद्धा हजेरी होती. सरपंचबाई, ग्रामसेवक, सदस्य सगळे पारावर येऊन बसले. शरदला सरपंचबाईनी शेजारीच बसवले. यावर्षीची पहिलीच ग्रामसभा असल्यामुळे सरपंचबाईंच्याच अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. ग्रामसेवकाने अजेंड्याप्रमाणे विषय घेतले. शेवटी आयत्यावेळच्या विषयात शरदला बोलण्याची परवानगी मिळाली. शरद बोलायला उभा राहिला आणि सभेत एकदम शांतता पसरली. सगळ्यांचे लक्ष शरद काय बोलतोय याकडे लागले.

''इथं जमलेली सगळी वडीलधारी मंडळी आणि माझ्या बंधू-भगिनींनो'' शरदने बोलायला सुरुवात केली, ''मला भाषण द्यायला येत नाही. पण, आपल्या गावाच्या भल्यासाठी काही गोष्टी तुमच्याशी बोलायच्यात, म्हणून इथं उभा आहे. त्या पटल्या तर चांगलंच. नाहीतर सोडून द्या.'' शरदच्या या बोलण्याने कुणाला काहीच उलगडा होईना. न राहवून एकाने हटकलेच, ''शरद, अरं पोरा, तुला काय सांगायचंय ते सांगून टाक, उगा आपलं नमनाला तेल का वाया घालवतूयस.''

''ठीक आहे, मी मुद्याचंच बोलतो.'' शरद पुढे बोलू लागला. मी शहरातून आल्यापासून गावात बराच हिंडलो. पण मला काही समाधान मिळालं नाही. घरापुढं घाण पाण्याची हबकी, रस्त्यावर घरातलं सांडपाणी वाहताना दिसतं. त्याच्यावर माशा घोंघावताना दिसतात. अशा साचलेल्या घाण पाण्यामुळे डासांची वाढ होते. त्यामुळे मलेरिया, हत्तीपाय यांसारखे रोग पसरतात. याचा त्रास लहान मुलांना आणि बायांना अधिक होतो.''

शरदचं बोलणं मधेच तोडत महिपतरावांनी

विचारलं, ''शरद, तू सांगतोयस ते समदं खरंय बघ. पण त्यावर काय उपाय असंल का नाय?'' ''आहे ना.'' शरदने उत्तर दिले, ''घरोघरी शोषखड्डा करणे हा त्यावर एक चांगला उपाय आहे.'' शरदच्या उत्तराने समाधान झाले नाही, म्हणून सरपंचबाईंनी मनातली शंका विचारली, ''नुसता शोषखड्डा काय कामाचा. त्यानी असा काय फायदा होणार आहे?'' शरदकडे त्या प्रश्नाचे उत्तर तयार होतेच.

तो म्हणाला, ''ताई, हा शोषखड्डा सुद्धा बराच फायद्याचा आहे. शोषखड्ड्यामुळे''

१) सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होईल.

२) घरासमोर, रस्त्यावर पाणी साचणार नाही व त्यामुळे दलदल होणार नाही.

३) वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरेल.

४) त्यामुळे जमिनीतल्या पाण्याच्या पातळीत वाढ होईल.

५) जवळच्या भागातल्या मातीचा ओलावा वाढेल.

६) त्या ओलीवर पपई, केळीसारखी झाडे वाढतील. मात्र त्या ओलीवर भाजीपाला व इतर फळझाडे लावू नयेत. कारण सांडपाण्यात आंघोळीच्या साबणाचे पाणी असते.

७) आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आजार व रोगराई कमी होईल.

शरदने सांगितलेली माहिती ऐकून सभेतल्या बाया-बाप्यांचं कुतुहल वाढलं. पहिल्यांदाच अशा सभेला आलेल्या मंजाबाईंनी आपली शंका विचारली, ''काय रं पोरा, एवढं समदं फायदं हायेत, तर मग हा सोकखड्डा करणं लय महागाचं असणारं?'' ''नाही काकू, शोषखड्ड्याला अजिबात खर्च येत नाही.'' शरद सांगू लागला. ''शोषखड्डा करण्यासाठी लहान-मोठे दगड-गोटे, फुटकी कौलं-विटा, वाळू, मडकं, पोतं (गोणपाट) अशा वस्तू लागतात. त्या आपल्याकडे असतात की. यासाठी केवळ तुमच्या मनाची व कष्ट करण्याची तयारी पाहिजे, बाकी काही नाही.

शोषखड्ड्यासाठी खर्च येत नाही, हे ऐकल्यावर सगळ्यांनाच ती कल्पना आवडली. पण अजून लोकांचे प्रश्न संपले नव्हते. पारावर इतका वेळ गप्प बसलेल्या शंकररावांनी तोंड उघडले, ''काय रं शरद, तू हा शोषखड्डा करायचा कसा ते नाय सांगितलंस.'' ''तात्या मला वाटलंच होतं, कुणीतरी हा प्रश्न विचारल म्हणून. पण उद्याच तुम्ही सगळी मंडळी माझ्या घरी या. मी शोषखड्डा प्रत्यक्षच करुन दाखवतो.'' शरदच्या उत्तराने सगळ्यांचं समाधान झालं आणि उद्या त्याच्या घरी जमायचं, असं ठरवून सभा संपली.

दुसऱ्या दिवशी सरपंचबाई, पाटील, गावातली काही प्रमुख मंडली, महिला व युवक शरदच्या घरी जमले. शरदने आपल्या घरामागेच परड्यात शोषखड्ड्यासाठी जागा निवडली होती. जागा पाहून पाटलांनीच पहिला प्रश्न विचारला, ''काय रं शरद, तू हीच जागा का निवडली?'' शरदला त्यांचा प्रश्न महत्त्वाचा वाटला. त्याचे उत्तर देत तो म्हणाला, ''पाटीलकाका, शोषखड्ड्यासाठी जागा निवडताना काही गोष्टी ध्यानात घ्यायला पाहिजेत. एकतर ती

घराच्या भिंतीला लागून नसावी. दुसरे असे की, ती खडकाळ व ओलसर नसावी. नाहीतर भिंतीत ओलावा तयार होतो आणि भिंतीचा पाया खचतो. आणि तिसरी गोष्टी म्हणजे ती घरापासून थोडी लांब अंतरावर असावी.''

''पण हा खड्डा किती मोठा करायचा, हे कसं ठरवायचं?'' भीमाकाकूंनी मध्येच विचारले. ''काकू, त्याचं पण गणित ठरलेलं आहे. आपल्या घरात किती माणसं आहेत, हे पाहून रोज पाण्याचा सरासरी किती वापर होतो, यावरून खड्ड्याचा आकार किती ठेवायचा हे ठरते. पहा, साधारणपणे आपल्या घरात पाच ते सहा माणसं असतील तर, शोषखड्ड्याचा आकार एक मीटर लांब, एक मीटर रूंद, आणि एक मीटर खोल (म्हणजे ३ फूट X ३ फूट X २ फूट) असा घ्यावा.'' शरदने समजावून सांगितले. त्यावर सरपंचबाईंनी शरदला सुचवले की, त्याने शोषखड्डा करता-करताच आम्हाला माहिती द्यावी. त्यामुळे सगळ्यांच्या लवकर ध्यानात येईल. शरदलाही ते पटले आणि त्याने खड्डा खोदायला सुरुवात केली. तो तयार झाल्यावर त्याने खड्डा भरायचा कसा, हे सांगायला सुरुवात केली.

''लक्षात ठेवा : शोषखड्डा भरताना त्याचे तीन भाग करावेत.

- तळातला पहिला भाग मध्यम आकाराच्या (१० ते १५ सें. मी. व्यासाच्या) दगड-गोट्यांनी भरून घ्यावा. हा भाग थोडा अधिक भरला तरी चालेल.
- मधला भाग तळातील दगडांपेक्षा लहान (५ ते १० सें. मी.) आकाराचे दगड, भाजलेल्या फुटक्या विटा. फुटकी कौले यांचा वापर करून भरावा.
- वरचा भाग अगदी लहान दगड-गोट्यांनी (वाळू/रेतीने) भरावा. या थरात जिथे सांडपाणी येऊन पडणार आहे तिथे मध्यम आकाराचे मडके बसवावे. मडक्याच्या बुडाला १०-१२ बारीक भोके, मडके फुटणार नाही याची काळजी घेऊन पाडावीत. नंतर मडक्यात नारळाचा काथ्या भरावा.
- खड्डा जमिनीच्या पातळीला भरल्यानंतर त्यावर पोत्याचे तटकर/बारदान/किलतान पसरवावे. त्याच्यावर माती-मुरूम ओढून ती जागा पहिल्यासारखी करावी.''

शरद माहिती देत होता, तेव्हा सगळे शांतपणे ऐकत होते. तेवढ्यात पाटलांच्या सचिनची शंका निघाली. त्याने विचारले, ''शरूदा, एकदा हा शोषखड्डा केला की, मग परत त्याच्याकडं बघायची गरज नाही का?''

''चांगला प्रश्न विचारलास, सचिन. पण तू समजतोस तसं नाही. शोषखड्ड्याची कायम निगा राखली पाहिजे. गरज भासेल तेव्हा मडक्यातला काथ्या बदलला पाहिजे. शक्यतो दर पंधरा दिवसांनी बदलावा, त्यामुळे खड्ड्यात पाणी नीट झिरपलं जाईल.'' शरदने शंकेचे निरसन केले; परंतु सचिनला अजूनही काही

प्रश्न होतेच. त्याने पुढे विचारले, ''पण हा शोषखड्डा परत उघडावा लागतो का?'' ''हो. ४-५ वर्षांनी शोषखड्डा परत उघडून त्यातले आधीचे साहित्य (दगड, विटा इ.) काढावे. खड्डा चांगला कोरडा करावा आणि परत त्यात नवीन साहित्य भरावे. त्यामुळे शोषण्याची क्रिया चांगली चालू राहील.'' शरदच्या उत्तराने सचिनचे समाधान झाले.

सगळेच प्रश्न विचारतात, मग आपण तरी मागं का राहायचं, असं मनात विचार करून शरदचे वडील पिराजीने आपली शंका विचारली, ''तू म्हणतोयस, खड्डा ३ फूट खोल करावा; पण मधीच जर खडक लागला तर काय करायचं?'' हा प्रश्न कोणीतरी विचारणार, असे शरदला वाटलेच होते. त्याने सांगितले, ''अशावेळी जेवढा खोल जाईल तेवढाच खड्डा घ्यावा आणि त्याची लांबी-रूंदी वाढवावी.

''पण काही ठिकाणी पाणी कमी जिरतं आणि खड्डं लवकर भरत्यात. मग अशावेळी काय करावं?'' पिराजीने पुढचा प्रश्न विचारला. शरदकडे त्याही प्रश्नाचे उत्तर तयार होते. तो म्हणाला, ''दादा, जिथे पाण्याचं प्रमाण जास्त आहे, अशाठिकाणी खड्ड्याची लांबी आणि रुंदी वाढवावी. आणि खड्डा भरताना त्यात भाजलेल्या विटांचे, कौलांचे प्रमाण जास्त ठेवावे. त्यामुळे पाणी अधिक शोषलं जातं.''

शरद सगळ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे समाधान करीत होता. पण सरपंचबाई गप्प बसलेल्या पाहून शरदने त्यांना विचारले, तेव्हा त्या म्हणाल्या, ''शरद, तू सांगतोयस ते समदं ठीक आहे, पण आपल्या गावात अशी बरीच घरं आहेत की ज्यांना शोषखड्ड्यासाठी जागा नाही. मग त्यांनी काय करावं?'' सरपंचबाईंचा हा प्रश्न सगळ्यांनाच पटला. पण याही प्रश्नाचं समाधान शरदकडे होतं. तो म्हणाला, ''ताई, ही अडचण कुठे न् कुठे येतेच. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी भांडणे सुद्धा होतात. पण त्यावर उपाय आहे. त्यासाठी सगळ्या घरांनी मिळून एका मोठ्या शोषखड्ड्यासाठी जागा शोधावी. याकामी ग्रामपंचायतीची मदत घेता येईल. प्रत्येक कुटुंबात किती माणसं आहेत, त्या हिशोबाने खड्ड्याचं आकारमान घ्यावं आणि प्रत्येक घरातून एकेका पाईपातून सांडपाणी त्या शोषखड्ड्यात सोडावे. मला वाटतं ताई, तुमची ग्रामपंचायत जागेचा प्रश्न सोडवू शकते.

''हो, जरुर गाव पण आपला नि ग्रामपंचायत पण आपलीच. मग हा प्रश्न सोडवणं काय अवघड आहे. जागा दिली म्हणून समजा.'' सरपंचबाईंच्या या उत्तराने गावकरी खूश झाले. पण हे सगळं शरदमुळं शक्य झालं, म्हणून सगळ्यांनी त्याचं कौतुक केलं. शरदलाही 'आज अपल्या कामाची सुरुवात चांगली झाली' याचं आणि 'आज गावकऱ्यांची एकी होऊन सरपंचबाईविषयी गावकऱ्यांच्या मनात असलेला गैरसमजही दूर व्हायला मदत झाली' या दोन्ही गोष्टींचं मनापासून समाधान वाटलं.

• • •

# वारली चित्रकलेतून दिसणारे समाजजीवन

**भुजंग गोविंद फडतरे**

वारली या आदिवासी लोकांनी भिंतीवर काढलश्रेली चित्रकला ही त्यांच्या सांस्कृतिक विकासाबद्दलची माहिती देणारे उत्तम साधन आहे. प्रादेशिक इतिहास हा इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह आहे. या नवप्रवाहाची सुरुवात स्थानिक इतिहासापासून सुरू होते. स्थानिक इतिहासाची माहिती पाहताना तेथील समाजाचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन आणि सांस्कृतिक जीवन या सर्वांची माहिती घेतली पाहिजे आणि म्हणूनच वारली जमातीच्या सांस्कृतिक जीवनातील वारली चित्रकला महत्त्वाची आहे. राष्ट्रीय चित्रकलेत वारली चित्रकलेला महत्त्व प्राप्त झाले आहे. या चित्रकलेतून समाजजीवनातील विविध घटकांची माहिती मिळते. अशा प्रकारे आदिवासींमधील दुर्लक्षित असणारे विविध पैलू हे प्रादेशिक व स्थानिक इतिहासामुळे प्रकाशात येत असतात. म्हणूनच प्रादेशिक इतिहासाला अन्यन्य साधारण महत्त्व आहे ?

प्राचीन काळातील मानवाला प्रारंभी निसर्गातूनच कलेची प्रेरणा मिळाली आहे. प्रागैतिहासिक काळातील जी काही चित्रे उपलब्ध झाली आहेत त्यांचा अभ्यास केल्यावर तत्कालीन मानवाच्या कलात्मक अभिरूचींची कल्पना करता येते. या काळातील चित्रे मुख्यत्वे गुहांच्या तोंडावर, शिलापृष्ठांवर किंवा भिंतीवर चितारलेली दिसतात. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे भीम बेटका, पछमडी गुहा (मध्यप्रदेश), केंमूर गुहा (उत्तरप्रदेश) या गुहांमधील वॉल पेटिंग्ज प्रसिध्द आहेत. महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन रंग चित्रकला ही पाटणे येथील होय, या गुहांवरील दगडाच्या काळ्या पार्श्वभूमीवर तत्कालीन दैनंदिन जीवनाशी संबंधित उदा. शिकार, नृत्य, शेती आदि विषयांवर ही चित्रे रेखाटलेली आहेत. या चित्रकलेचा पुढचा विकासाचा टप्पा म्हणजे वारली चित्रकला होय.

प्राचीन काळातील साहित्यात 'वारली' जमात ही विविध नावांनी ओळखली जाते. कात्यायनाने आपल्या एका 'वार्तिकांत' या ग्रंथात विंध्य व सातपुडा या पर्वतावर निषाद, व्यास व वरूड अशा तीन अनार्य जमाती राहत होत्या, असा उल्लेख केला आहे. वरूड म्हणजे वारली असे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी महिकावतीच्या बखरीत म्हटले आहे. वरूड या शब्दापासूनच वारूली - वारली शब्दप्रयोग झाला आहे. महाराष्ट्रामधील ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, पालघर, वाडा, वसई, जव्हार, मोखाडा, शहापूर या भागात वारली जमातीचे आदिवासी मोठ्या प्रमाणात वसलेले आहेत. ह्या लोकांनी भिंतीवर रेखाटलेली चित्रकला ही 'वारली' चित्रकला म्हणून प्रसिद्धीस आली. वारली चित्रकला काढण्यामध्ये तेथील स्त्रिया (धवलेरी म्हणजे चित्र काढणाऱ्या स्त्रिया), भगत यांचा महत्त्वाचा वाटा आहे, जरी या जमातीचे कुटुंब पितृप्रधान

कुटुंब पद्धतीचे असले तरी स्त्रियांनी चित्रकला काढण्यात घेतलेली आघाडी हे वारली चित्रकलेचे खास वैशिष्ट्या आहे.

वारलींच्या झोपड्या चौकोनी आकाराच्या असतात. झोपड्यांच्या भिंतीसाठी कोवळ्या बांबूचे तुकडे वापरतात त्यास 'बुंधी' असे म्हणतात. कारवी वनस्पतीच्या काड्यांचाही भिंतीसाठी उपयोग करतात. शेण आणि मातीचे मिश्रण करून बुंधीच्या किंवा कारवीच्या भिंती लिंपतात. यालाच 'कुड लिपणे' असे म्हणतात. त्यावर गेरू, चुना किंवा तांदळाच्या पेस्टचा रंग देतात. वारली लोकांची भित्तीचित्रे घराच्या दर्शनी भिंतीवर आणि मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूला असतात.

वारली चित्रकलेच्या निर्मितीचे मूळ निसर्ग, माध्यम निसर्ग आणि त्यांचा आविष्कारही निसर्गच असतो. हे त्यांच्या चित्रकलेचे खरे वैशिष्ट्य आहे. वारली लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक चित्रात शेती किंवा निसर्ग (चित्र क्र. १) दाखविलेला आहे. भाताच्या पिकात साप, बेडूक, खेकडा, विंचू, काम करणारे स्त्री-पुरुष इत्यादींना चित्रात दाखविलेले आहे.



**वारली चित्रकलेत रेखाटलेली दैनंदिन जीवनातील चित्रे**

| | | |
|---|---|---|
| शेतीची निगडीत | – | भात लागवड, भात काढणी, भात मळणी, बैलगाडी, नांगर, विहीर, नदी, झाडे, वेल, डोंगरदऱ्या. |
| प्राणी | – | बैल, घोडा, वाध, हरीण, साप, विंचू, खेकडा, कुत्रा, शेळी, मुंगी, बेडूक |
| पक्षी | – | मोर, कोंबडा |
| उत्सव | – | तारपा नृत्य, लग्नसमारंभ, देवपूजा, मांडव, देवचौक, महालक्ष्मी सारखे उत्सव. |
| मानव | – | वारली स्त्रिया, पुरुष, लहान मुले, मुली |

इत्यादी चित्रे वारली चित्रकारांनी भिंतीवर रेखाटलेली आहेत. या चित्रांचे निरीक्षण केले असताना त्रिकोण, चौकोन, वर्तुळ (चित्र क्र. २) हे मूलभूत




आकार वापरल्याचे दिसते. वारली चित्रकलेत कौशल्यापेक्षा उत्स्फूर्त आविष्कारातून ती काढल्याचे दिसते. अशा विविध चित्रातून वारलीच्या समाजजीवनाची माहिती मिळते. तसेच वारली चित्रकलेत स्त्री व पुरूष यांच्या चेहऱ्यासाठी भरीव गोलाकार वापरल्याने चेहऱ्यावर कोणतेही हावभाव दिसत नाहीत. स्त्री व पुरुष यांच्यातील फरक ओळखण्यासाठी स्त्रियांच्या डोक्यावरील आंबाड्यावर छोटा भरीव बिंदू तर पुरुषांच्या डोक्यावर शेंडी दाखविलेली असते. शरीरासाठी भरीव दोन त्रिकोण व हातपायासाठी बारीक रेषा काढलेल्या आहेत.

वारली लोकांचे धार्मिक जीवन हे वैदिक संस्कृतीशी साम्य दिसते. कणसरी, धरतरी, सूर्यदेव, चंद्रदेव, डोंगर, वृक्ष, नारनदेव व वाघदेवाची पूजा करत असते. या सर्वांच्या बद्दल वारलींच्या मनात असलेला आदरभाव ते भिंतीवरील चित्रात व्यक्त करतात. नागपंचमी, दसरा, दिवाळी, होळी अशा उत्सवाच्या प्रसंगी भिंतीवर मोठ्या प्रमाणात चित्र काढत असत. 'चित्राखेरीज भिंत म्हणजे कपड्याखेरी मनुष्य' अशी वारली लोकांची समजूत आहे. मुला-मुलींच्या लग्नाच्या वेळी जी भित्तीचित्रे काढतात त्या प्रसंगाच्या भित्तीचित्रांना 'देवचौक' म्हणतात. देवचौकात नवरा-नवरीचे चित्रे (चित्र क्र. ३) काढतात. मानवाहून अधिक शक्तीशाली, जननक्षमता असलेल्या वृषभाच्या शिंगाच्या आकारासारखे बाशिंगाचे चित्रण भित्तीचित्रात ठळकपणे दिसते. 'पालघाट' ही प्रजोत्पत्तीची देवता असल्याने तिचेही चित्र काढलेले असते. ही दोन्ही चित्रे लग्नविधीच्या प्रसंगी महत्त्वाची आहेत. या दोन्ही



चित्रांमधून असे दिसते की, घरातील वयोवृद्ध लोकांनी नवरा-नवरीला एकत्र आणून आपला वंश पुढे चालू ठेवण्यास सांगितलेले आहे. या व्यतिरिक्त सूर्य, चंद्र, झाडे, घोडा, पक्षी अनेक स्त्री-पुरूष यांची देखील चित्रे काढलेली असतात. देवचौकाचे चित्र मुख्यत: स्त्रिया (धवलेरी) काढतात. त्यामुळे वारली चित्रकला ही धवलेरीची चित्रकला म्हणून देखील ओळखली जाते.

वारली चित्रकलेत सर्वात आकर्षक चित्र म्हणजे तारपा नृत्याचे चित्र (चित्र क्र. ४) होय. हे नृत्य वारली संस्कृतीचे खास वैशिष्ट्य देखील आहे. भातशेती पिकाच्या भरात आली आहे की, वारली लोकांचा समूह भाद्रपद वद्य द्वादशीला 'महालक्ष्मी' देवतेसमोर



हे नृत्य करतात. तारपा हे पुंगीसारखे वाद्य असते. आदिवासी माणूस पुंगी वाद्य घेऊन वाजवत असतो. त्याच्या भोवती तरूण तरूणी खांद्यात खांदा लावून नृत्य करतात. नृत्याच्या शेजारी भात, झाडे, प्राणी म्हणजेच बहरात आलेल्या शेतीची दृश्य देखील दाखविलेले असते. तारपा नृत्य आणि शेती यांचे एकमेकांशी असणारे जवळीकतेचे नाते दर्शविलेले आहे. पारपा नृत्य चित्राचे निरीक्षण केल्यास त्यांच्या विविध लयी, ताल, सूर आणि नृत्य यांची माहिती मिळते. हे चित्र खरोखरच मानवाच्या विचाराला चालना देणारे दृश्य आहे.

वारली चित्रकार तांदळाचे पीठ, गेरू, काजळी, रंगीत फुले, झाडांचा चीक, रंगीत माती इत्यादींचा चित्र काढण्यासाठी उपयोग करतात. वारली लोकांनी निसर्गातील झाडांपासून विविध रंगाची निर्मिती केली आणि तिचा वापर आपल्या कपड्यावरील चित्रकलेत उपयोग केलेला आहे.

| रंग | वनस्पती किंवा झाड |
|---|---|
| गडद निळा रंग | महाकुंच फुलापासून |
| पिवळा रंग | रान फणसापासून |
| लाल रंग | पळसाच्या फुलापासून |
| पांढरा रंग | तांदळाचे पीठ |
| काळा रंग | कोळसा, काजळी |

वारली लोकांना नैसर्गिक रंगाचे ज्ञान चांगलेच अवगत होते. झाडे रंगविताना मुळाकडून शेंड्यांपर्यंत रंगवीत असत. या प्रक्रियेतून झाड वर उगवण्याची भावना त्याच्यातून प्रकट होते.

वारली चित्रकलेत 'सांकेतिकता' दिसून येते. ही सांकेतिकता म्हणजे वारलींची चित्रलिपीच म्हणावी लागेल. संकटापासून घराचे संरक्षण होण्यासाठी सूर्य आणि चंद्र यांचे दर्शनी भागावर काढतात. नव्या धान्याची पूजा करताना चौरस काढून त्यात वाढत्या वेली दाखवितात. नदी, नाले हे आडव्या, उभ्या आणि तिरप्या रेषांनी सूचित करतात. धरती मातेच्या पूजेसाठी विशिष्ट आकाराचा चौकोन काढतात. शेतीसाठी भरपूर पाऊस झाल्यास चौकोनात अनेक बेडूक दाखवितात. चित्रातील रंगांच्या संदर्भात रंगाची खूण नारन्देवाचे प्रतीक समजले जाते. ह्या सांकेतिक चित्रामधून त्यांची एक वेगळीच भाषा असल्याचे आपणास दिसून येते. वारली भित्तीचित्रणात काही कल्पनात्मक गोष्टी दिसतात. ज्या गावाच्या जवळपास पाणी आहे त्या गावातील भिंतीवर काढलेल्या चित्रामध्ये कमळाचे फूल दिसते. परंतु ज्या गावात दूरच्या अंतरावरून पाणी आणले जाते तेथील भिंतीवर चित्रात मात्र कमळ दिसत नाही. अशाच प्रकारचे चित्र ताडीच्या संदर्भात देखील आहे. कमळाऐवजी ताडीची झाडे असतात. ज्या लोकांना लिहिता, वाचता येत नाही परंतु त्यांना या चित्रावरुन योग्य तो संदेश मिळतो. आदिवासी वारली लोकांची एक वेगळीच चित्रलिपी असल्याचे आपणास दिसते.

समाजाच्या दृष्टीने मानव आणि निसर्ग यांचे अतूट नाते असते. हे नाते वारली चित्रकारांनी आपल्या चित्रातून रेखाटलेले आहे. त्यांच्या प्रत्येक चित्रात निसर्ग दिसत असून त्याचा मानवाशी संबंध जोडलेला

(पृष्ठ क्र. ३३ वर पहा)